# भारताची दुसरी गुलामी

रमेश पानसे

P019

# 'भारताची दुसरी गुलामी'

प्रा. रमेश पानसे

प्रकाशक :
प्रज्ञा चॅरिटेबल ट्रस्ट
सोनोरी, ३६ चरई,
ठाणे ४०० ६०१

© प्रा. रमेश पानसे

मूल्य : १५ रुपये

# अर्पणपत्रिका

देशाच्या कानाकोपऱ्यांतून अखंडपणे वसा घेऊन
नि ध्येयप्रेरित होऊन, सर्वोदयाचे काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांना.

# दोन शब्द

'भारताची दुसरी गुलामी' या पुस्तिकेची पांडुलिपी मी दोनदा वाचून काढली. इतकी ती मला आवडली. भारत अदमासे दोन शतकांपूर्वी गुलाम का झाला याची अर्थशास्त्रीय कारणमीमांसा विद्वान लेखकाने या पुस्तिकेत पहिल्या प्रकरणात केली आहे. राज्य करणे हे साध्य नसून व्यापारवृद्धीचे अपरिहार्य साधन कसे आहे, हे मुद्देसूद रीतीने लेखकाने मांडले आहे. भारतातील कच्चा माल स्वस्त दराने विकत घेऊन या देशातच त्यांनी त्यातून पक्का माल का तयार केला नाही, हा प्रश्न प्रारंभीच उपस्थित केला आहे. "ब्रिटिशांनी व्यापार जगाशी केला, पण रोजगारनिर्मिती मात्र स्वत:च्याच देशात केली." या कारणमीमांसेतून निष्कर्ष काढला; "नुसत्या व्यापाराने देश श्रीमंत होतो. पण देशातील नागरिक श्रीमंत व्हावयाचे असतील तर ही श्रीमंती सामान्य लोकांच्यातच वाटली जावी लागते आणि तिच्या वाट्याची एकच खात्रीशीर पद्धत असू शकते व ती म्हणजे सर्वांसाठी रोजगार निर्मिती." रोजगाराच्या अर्थशास्त्राचे सूत्र प्रारंभीच पकडून त्या आधारे पुढील सर्व विवेचन केले आहे. गांधी विचार या दृष्टीने कसा प्रासंगिक आहे, हे लेखकाने अत्यंत बुद्धिगम्य रीतीने दिग्दर्शित केले आहे. पुस्तिकेतील पुढील विधाने यादृष्टीने मननीय आहेत.

"विकासातील कळीचा मुद्दा रोजगाराचा आहे."

"ब्रिटीशांच्या स्पर्धेत न टिकता आल्यामुळे येथील लहान रोजगारांची दयनीय अवस्था झाली. कौटुंबिक रोजगार नाहीसे झाले." त्याजबरोबर,

"परदेशी मालाच्या वास्तविक प्रभावाइतकाच त्याचा मानसिक प्रभावही हिंदुस्थानच्या दुरवस्थेस कारण ठरला."

"स्वातंत्र्यानंतरही हा प्रभाव कायम राहिला हीच या संदर्भातील मानसिक गुलामगिरी होय."

"आंतरराष्ट्रीय व्यापार हा कायमच श्रीमंत राष्ट्रांना फायदेशीर आणि गरीब राष्ट्रांना नुकसानीचा होत आला आहे."

"रिकार्डोच्या सिद्धांताचे गृहीत तत्त्व आहे की, प्रत्येक राष्ट्र आपणास पुरून उरणाऱ्या, म्हणजे, अतिरिक्त वस्तू दुसऱ्याकडे निर्यात करीत आहे; आणि दुसरे म्हणजे, त्या वस्तू तुलनेने आपल्या राष्ट्रात स्वस्त तयार होत आहेत." या दोन्ही गृहीतांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे "अभिजात अर्थशास्त्राच्या मानसिक गुलामगिरीची अवस्था" आली.

"या आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडणे फारच दुर्लभ आहे."

"विकसनशील राष्ट्रांचे प्रश्न अत्यंत तीव्र आहेत व त्यांची उत्तरे श्रीमंत राष्ट्रांकडे नि त्यांचेच वर्चस्व असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडे आहेत."

"संयुक्त भांडवली संस्थेची पुढील विकासावस्था बहुराष्ट्रीय कंपनी आहे."

"गरीब राष्ट्रांची औद्योगिक धोरणे आणि व्यापार धोरणे ही तिची (बहुराष्ट्रीय कंपनीची) साधने आहेत. गरीब राष्ट्रांवरील श्रीमंत देशांचे कायम स्वरूपाचे आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करणे हे तिचे उद्दिष्ट आहे."

विनोबाजींनी नियोजन मंडळात दिलेला द्विविध सल्ला उद्धृत करत लेखक म्हणतो, की अन्नधान्यात स्वयंपूर्णता होणे म्हणजे सर्वांना अन्न मिळतेच असे नाही. सर्वांना रोजगार मिळाला तरच हे शक्य आहे. "परकीय मदतीचे आपणास व्यसनच जडले आहे." असे अर्थपूर्ण विधान लेखकाने केले आहे. निर्यात हा कर्तृत्वाच्या परवलीचा शब्द बनला असून, शेतवस्तूंच्या निर्यातीत रिकार्डोचा अतिरिक्त मालाचा व्यापार हे गृहीत दुर्लक्षिले गेले. शिवाय, "नैसर्गिक साधनांची किंमत लावली पाहिजे, कारण त्यांची झालेली झीज भरून काढण्यास भांडवली खर्च येतो", हे अर्थशास्त्रात भर घालणारे मौलिक विधान लेखकाने केले आहे. यामुळे एक पीक पद्धती बळावते. व अधिकाधिक गरीब लोकांना या वस्तूंच्या उपभोगाबाहेर ही निर्यात ढकलत राहते. अशारितीने नववसाहतवाद कसा निर्माण होतो, हे लेखकाने मोजक्या शब्दात, समर्थपणे प्रतिपादन केले आहे. यातून महात्मा गांधींनी सांगितलेल्या दिशेचा विचार, स्वयंपूर्ण-स्वावलंबी खेडे हा अपरिहार्य ठरतो.

'ग्रामीण विकासाची गांधीप्रणीत सप्तपदी' या दुसऱ्या निबंधात लेखकाने गांधी साहित्य सागरातून इतस्ततः विखुरलेली मौलिके निवडून खेड्याच्या सेवेसाठी एक हारच जणू निर्माण केला आहे. यातील ग्रामीण संस्कृती व शहरी संस्कृती यामधील फरक व गांधीजींची स्वयंपूर्ण खेड्यांची संकल्पना यावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. ५००० लोकसंख्येच्या खेड्याबाबतचे विचार, त्यांनी आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या युनिटच्या दृष्टीने मांडला आहे. महात्मा गांधीच्या या कल्पनेचा आशय लक्षात घ्यावा. शब्दार्थ घेऊ नये हे तर लेखकाचे प्रतिपादन उचितच आहे. पण पाच हजारांच्या खेड्यात 'फेस टू फेस' लोकशाही कशी चालू शकेल ही शंका येते. कारभाराचे युनिट छोटे हवे. अन्यथा ग्रामस्तरावरही प्रातिनिधिक लोकशाहीशिवाय गती राहणार नाही. आज भारताच्या खेड्याची सरासरी लोकसंख्या एक हजार आहे. यातून मार्ग असा काढता येईल की एक हजार वस्तीच्या खेड्यात प्रत्यक्ष लोकशाही व अन्न, वस्त्र, निवारा, व प्राथमिक शिक्षण आणि आरोग्य या बाबींबाबत

स्वयंपूर्णता आणि पाच हजार वस्तीच्या क्षेत्रात माध्यमिक शिक्षण, जास्त मागणी असलेले प्रक्रिया उद्योग इत्यादी. अशारितीने विभागणी केल्यास खेडे स्वयंपूर्ण व प्रत्यक्ष कारभाराच्या दृष्टीने कार्यक्षम राहील व इतर आर्थिक बाबी ५००० वस्तीच्या पंचायतस्तरावर केल्या जाऊ शकतील.

विद्वान लेखकाने गांधीजींचे उर्ध्वगामी नियोजन व पंचवार्षिक योजनेचे अधोगामी नियोजन यातील फरक स्पष्टपणे मांडला आहे. "गांधीजींना केन्द्रीकरणाकडून विकेन्द्रीकरणाकडे वळणारी व्यवस्था अभिप्रेत नव्हती, तर अकेन्द्रित व्यवस्था ते शोधत होते". 'अकेन्द्रित' शब्दाने गांधीचा नेमका आशय स्पष्ट होतो, म्हणून हा शब्दप्रयोग समर्पक आहे. जिल्हा नियोजन हे राष्ट्रीय नियोजनाचेच छोटे रूप आहे. क्षेत्रीय वाटणी असलेले वित्तीय नियोजन हेच त्याचे स्वरूप राहिलेले आहे हा निष्कर्ष योग्य आहे. लेखकाने हिंदू संस्कृती व मिशनरी पद्धती यातील भेद ठळकपणे मांडला आहे. अर्थात हिंदूंची आजन्म-ब्रह्मचाऱ्याची कल्पना ही मिशनरी पद्धतीसारखीच आहे. विनोबांसारखे तेजस्वी अपवाद सोडल्यास ती फारशी वाढली नाही, ही शोकान्तिका होय. गांधीजींना याही बाबतीत मोठे यश लाभले. हे खेड्याकडे जाणारी एक पिढी गांधींनी निर्माण केली यावरून स्पष्ट होते. गरजा या सातत्याने वाढतच जातात, या गृहीतावर आधारलेल्या पाश्चात्य अर्थशास्त्रावर गांधींनी 'मूले कुठार:' या न्यायाने सुखी, संतुष्ट व स्वयंपूर्ण खेड्यांची कल्पना मांडली आहे. म्हणून 'म. गांधी केवळ ग्रामीण जीवनातील भौतिक सुधारणांविषयीच बोलत नाहीत, तर मानसिक बदलाविषयीही बोलतात. रोगांवर तात्कालीक उपाययोजनांऐवजी सार्वकालिक उपाययोजना सांगतात. व राष्ट्रीय स्तरावरून नव्हे, जागतिक स्तरावरून बोलतात. "ग्रामीण पुनर्रचनेची त्यांची कल्पना केवळ सुधारणेची नाही, तर मूलभूत क्रांतीची आहे." या वाक्यात लेखकाने आपल्या प्रबंधाचा समारोप केला आहे.

असे हे मौलिक विचारधन पुस्तक पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटते. लेखकाने हे पुस्तक लिहून गांधीयानात मोलाची भर टाकली आहे. या पुस्तकाचा व्यापक प्रसार झाल्यास विचार परिवर्तनाचा प्रारंभ होऊ शकतो हे निर्विवाद.

प्रवास : सहारनपुर (उत्तरप्रदेश) ठाकूरदास बंग

# भूमिका

या पुस्तकात माझी दोन व्याख्याने लिखित स्वरूपात संग्रहित केली आहेत. पहिले, 'भारताची दुसरी गुलामी' हे अगदी अलीकडे म्हणजे दि. १२ फेब्रुवारी १९९२ रोजी, बोर्डी, जि. ठाणे, येथील सर्वोदय मेळाव्यात दिलेले व्याख्यान विस्तारित स्वरूपात येथे दिलेले आहे. दुसरे, वास्तविक यापूर्वी दिलेले, म्हणजे २८ डिसेंबर १९८७ रोजी, फैजपूर कॉंग्रेस (१९३६) च्या, खेड्यातील पहिल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या सुवर्णमहोत्सवी समारंभाच्या सांगता समारंभात दिलेले व्याख्यान आहे. ही दोन्ही व्याख्याने ज्या अनुक्रमाने छापली आहेत, याच पद्धतीने वाचल्यास त्या दोहोंतील संबंध वाचकांच्या लक्षात येईल. पहिल्या निबंधात भारताच्या सद्य:कालीन परिस्थितीचे ऐतिहासिक-सैद्धांतिक विश्लेषण असून, गांधीप्रणित ग्रामीण अर्थव्यवस्थेचे व्यावहारिक स्वरूप कसे असावे हे प्रामुख्याने गांधींच्याच शब्दांमध्ये मांडण्याचा प्रयत्न, हा दुसऱ्या निबंधाचा विषय आहे.

केवळ भारताच्याच नव्हे, तर जागतिक स्तरावर तिसऱ्या जगातील विकसनशील राष्ट्रांच्या गुलामीचा प्रश्न हा पुढील शतकाचा चिंतेचा विषय असणार आहे. ही राष्ट्रे, राजकीय वसाहतवादाच्या गुलामीतून बाहेर पडली असली तरी, ती दिवसेंदिवस, अधिकाधिक प्रमाणात आर्थिक वसाहतवादाच्या गुलामगिरीच्या विळख्यात अडकत चालली आहेत. विकसित राष्ट्रे आणि त्यांचेच वर्चस्व असलेल्या आंतरराष्ट्रीय संस्था आणि बहुराष्ट्रीय कंपन्या हा नववसाहतवादाचा विळखा व्यापक आणि घट्ट करीत चालल्या आहेत.

वेळीच आपण हा धोका ओळखला पाहिजे. त्यासाठी स्वदेशीचे व्रत हा नांदीचा उपाय झाला, परंतु स्थानिक रोजगाराभिमुख अर्थव्यवस्थेची स्थापना हाच दीर्घकालीन उपाय असू शकेल. गांधी-विनोबांनी याची काही मूलतत्त्वे सांगून ठेवली आहेत; विचारांची पक्की दिशा देऊन ठेवली आहे. त्यांच्या विचारांचा भावनिक अंगिकार न करता, बुद्धिपुरस्सर त्यांचा विस्तार व अवलंब करायला हवा. 'सर्वोदया'चा आर्थिक-सामाजिक आणि राजकीय पाया बळकट करण्याचे आव्हान बुद्धिमंतांना पेलावे लागेल आणि सर्वोदय चळवळीला प्रबोधनाचे व्यापक परिमाण प्राप्त करून द्यावे लागेल.

ही दोन व्याख्याने किंवा हे पुस्तक हा या दिशेने केलेला एक छोटासा प्रयत्न आहे.

गांधी विचारांच्या क्षेत्रातील अग्रेसर नि कृतिशील विद्वान श्री. ठाकूरदास बंग यांच्या प्रस्तावनेमुळे या पुस्तकाचे आंतरिक मूल्य वाढले आहे अशी माझी भावना आहे. मी त्यांचा कृतज्ञ आहे.

**रमेश पानसे**

# भारताची दुसरी गुलामी

अलीकडच्या जागतिक इतिहासाकडे नजर टाकली तर असे लक्षात येईल की, इसवीसनाचे अठरावे व एकोणिसावे ही शतके राजकीय वर्चस्वाची अथवा राजकीय गुलामगिरीची शतके होती. पाश्चात्य राष्ट्रांनी पौर्वात्य राष्ट्रांवर आणि उत्तरेकडच्या राष्ट्रांनी दक्षिणेकडच्या राष्ट्रांवर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. अशिया, अफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील अनेक राष्ट्रे राजकीय गुलामगिरीत अडकली. यालाच आपण राजकीय वसाहतवाद म्हणून संबोधतो.

## राजकीय वसाहतवाद

या राजकीय वसाहतवादाचे एक तंत्र होते. आपल्या देशाच्या संदर्भातील उदाहरण घेऊन ते समजावून घेता येईल. ब्रिटिशांनी भारतात, व्यापारासाठी प्रवेश केला. इ. स. १६०० मध्ये स्थापन झालेल्या, आणि स्वत: राणीच जिची एक भागधारक होती अशा ईस्ट इंडिया कंपनीने, भारतात आपला व्यापार प्रस्थापित करण्यासाठी, इथल्या असंख्य छोट्या-मोठ्या राज्यांशी जुळवून घेण्याचा आणि फ्रेंच, पोर्तुगीज अशा प्रतिस्पर्ध्यांशी मुकाबला करण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही गोष्टींसाठी त्यांना प्रसंगी शस्त्रबळाचा नि राजकीय नीतीचा वापर करावा लागला. किंबहुना यासाठीच, म्हणजे व्यापार वृद्धीसाठीच त्यांना राजकीय वर्चस्व स्थापनेचा आश्रय घ्यावा लागला. थोडक्यात असे म्हणता येईल की ब्रिटिशांचे भारतातील राजकीय वर्चस्व हे त्यांच्या आर्थिक व व्यापारवृद्धीचे अपरिहार्य असे साधन होते.

## वसाहतवादाची अर्थनीती

या वसाहतवादाची स्वत:ची अशी एक अर्थनीती होती. गुलाम देशामधील निसर्गदत्त असा कच्चा माल, स्वस्त दरात खरेदी करायचा, आणि आपल्या देशातील लोकांना रोजगार देऊन त्याचे रुपांतर पक्क्या मालांत करावयाचे आणि पुन्हा तो पक्का माल गुलाम देशात विकून नफा कमवायचा. म्हणजे गुलाम देशाचा दुहेरी उपयोग करवून घ्यायचा. एक, कच्च्या मालाच्या उपलब्धतेचे भांडार म्हणून आणि दोन, पक्क्या मालाच्या

विक्रीसाठी बाजारपेठ म्हणून. या अर्थनीतीतील लक्षात ठेवण्याची मुख्य गोष्ट अशी की ब्रिटिशांनी कधीही कच्च्या मालाचे रूपांतर, इथल्या इथेच, पक्क्या मालात करण्याचे योजले नाही किंवा त्यासाठी भारतात कारखाने काढले नाहीत. ते काढले मँचेस्टरमध्ये. वास्तविक या व्यवहारात त्यांना कच्च्या मालाची नि पक्क्या मालाची ने-आण करण्यासाठी वेळेचा आणि पैशांचा फारच मोठा अपव्यय करावा लागत होता. बरं, ब्रिटिशांना आपल्या देशातील तंत्र इथे आणून इथेच कारखाने काढणे काही अशक्य नव्हते. शिवाय भारतात श्रमाचीही अतिशय स्वस्तात आणि मुबलक अशी उपलब्धता होती. असे असतांना हा 'अव्यापरेषु' व्यापार ब्रिटिशांनी का करावा बरे? ब्रिटिशांच्या या शहाणपणाच्या मागे एक अर्थशास्त्र होते. आणि बऱ्याचदा ते विसरले तरी जाते किंवा लक्षातच घेतले जात नाही.

ब्रिटिशांनी तुमच्याकडून कच्चा माल घेतला तो काही फुकट घेतला नाही, त्याची जी काही किंमत तत्कालीन बाजारात असेल ती देऊनच घेतला. त्यात वाहतुकीचा खर्चही केला. पण हा सगळा खर्च शेवटी, दामदुपटीने, त्यांनी या भारतियांकडून वसूलही केला. तयार वस्तूंच्या किंमतींच्या स्वरुपात. थोडक्यात, हिंदुस्थानाने आपल्या देशातील कच्च्या वस्तूही ब्रिटनला दिल्या आणि त्याची वसूल केलेली किंमतही परत, ब्रिटिशांचा पक्का माल खरेदी करुन, अधिक रकमेने त्यांना परत केली. आणि या व्यापार पद्धतीने हिंदुस्थानचे धन इंग्लंडकडे वळले ते कायमचे.

### व्यापार जगात, रोजगार देशात

परंतु कळीचा मुद्दा वेगळाच आहे. ब्रिटिशांनी कच्च्या व पक्या मालाच्या दुहेरी वाहतुकीचा अपव्यय का स्विकारला? आणि ब्रिटिशांनी, शक्य असूनही इथे हिंदुस्थानात कारखाने का काढले नाहीत? इथल्या स्वस्तात उपलब्ध असलेल्या श्रमाचा वापर का केला नाही? या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर आहे, आणि ते म्हणजे, ब्रिटिशांनी व्यापार जगाशी केला पण रोजगार निर्मिती मात्र स्वत:च्याच देशात केली. नुसत्या व्यापाराने देश श्रीमंत होतो पण देशातील नागरिक श्रीमंत व्हावयाचे असतील तर ही आयात श्रीमंती सामान्य लोकांच्यात वाटली जावी लागते आणि तिच्या वाट्याची एकच खात्रीशीर पद्धत असू शकते व ती म्हणजे सर्वांसाठी रोजगार निर्मिती.

ब्रिटिशांनी आपल्या वसाहतवादी व्यापार तंत्रात याची कायमच काळजी

घेतली. त्यांच्या प्रत्येक कृतीतून, धोरणातून नि नवनिर्मित कायद्यांतून त्यांनी रोजगार निर्माण केला तो ब्रिटनच्या भूमीवर. इथे अर्थातच आनुषंगिक रोजगार जरुर निर्माण झाला. परंतु त्यातही उच्च पदांचा मोठ्या पगाराचा रोजगार ब्रिटिशांसाठीच राखून ठेवला. वाहतुकीच्या बाबतीतही असे कायदे केले की, ब्रिटिश वाहतुक कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करता येईल, आणि देशात उद्योगांचा विस्तार करुन आपल्या भूमीपुत्रांसाठी आपल्याच देशात रोजगार वाढता ठेवता येईल.

हे रोजगाराचे अर्थशास्त्र समजावून घेतले तर असे लक्षात येईल की, रोजगारातून एकीकडे राष्ट्रात उत्पन्न (वस्तू व सेवांचे उत्पादन) निर्माण होत असतानाच दुसरीकडे, व्यक्तिगत स्तरावरील दारिद्रय दूर होत असते. रोजगार असणे म्हणजे व्यक्तीला व त्याच्या कुटुंबाला आपल्या किमान गरजा भागवून जगण्याची आणि या व्यवस्थेला सुरक्षिततेची हमी असते. तसेच या आर्थिक सुस्थितीबरोबर मानसिक स्वास्थ्यही लाभत असते ते वेगळेच.

समजा ब्रिटिशांनी इथल्या कच्च्या मालाच्या सहाय्याने आणि इथल्याच श्रमाच्या मदतीने हिंदुस्थानातच कारखाने काढले असते तर काय घडले असते ? आपण नुसता तार्किक विचार करीत गेलो, तरी हे लक्षात येईल की, ब्रिटिशांना, इथल्या कच्च्या मालाचे, इथल्याच श्रमाच्या सहाय्याने, पक्क्या मालात रुपांतर करुन ते इथेच विकल्याने कोणतेही आर्थिक नुकसान झाले नसते, म्हणजे असे की निव्वळ व्यापारी नफा, त्यांना, याही व्यवहारात मिळाला असता. कदाचित् वाहतुक खर्च वाचल्याने आणि श्रमखर्च तुलनेने कमी असल्याने, या वस्तू आणखी स्वस्त ठेवून जास्त मागणीचा लाभ उचलता आला असता किंवा तीच किंमत ठेवून नफ्यांचे प्रमाण अधिक प्राप्त करुन घेता आले असते. यापैकी कोणत्याही मार्गाचा जरी अवलंब केला असता तरी व्यापारजन्य निव्वळ नफा त्यांना अधिकच मिळवता आला असता. परंतु त्यांनी तसे केले नाही. कारण या जादा नफ्याच्या बदल्यात त्यांना वाहतुकीच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या आणि उद्योगाच्या क्षेत्रात उपलब्ध झालेल्या असंख्य रोजगारांची जबरदस्त किंमत घ्यावी लागली असती. आणि मग काही व्यापारी फार श्रीमंत झाले असते, पण ब्रिटिश समाज एक समयावच्छेदेकरुन संपन्न झाला नसता.

या विशिष्ट अशा वसाहतवादी अर्थशास्त्राचे परिणामवजा असे आणखीही एक तत्व आपण लक्षात घ्यायला हवे व ते म्हणजे, जेव्हा देशातील थोडा समाजच आर्थिकदृष्ट्या संपन्न होतो तेव्हा त्या देशाच्या कतृत्वाचे मान नेहमीच मर्यादित राहते. चांगले राज्यकर्ते, चांगले अर्थवेत्ते, धडाडीचे संशोधक आणि अगदी दमदार खेळाडूही, उद्योगपती – प्रतिभावान कलावंतही, तो देश, मर्यादित प्रमाणातच निर्माण करु शकतो. देशात कोणीही ''गरीब'' नसेल तर, देशाच्या कर्तृत्वाच्या मर्यादा वाढण्याच्या शक्यताही खूपच विस्तारतात. सर्वच क्षेत्रांतील विकासाचा वेग उड्या मारू लागतो.

थोडक्यात, या दोनशे वर्षाच्या गुलामगिरीतून आपण हा धडा शिकायला हवा होता, आणि आज शिकायला हवा, की विकासाच्या व्यापारातील कळीचा मुद्दा रोजगाराचा आहे. जो व्यापार देशातील रोजगारवृद्धी करतो तो उत्तम व्यापार; आणि जो व्यापार देशातील रोजगार मारतो तो अहितकारक व्यापार होय. ब्रिटिशांच्या व्यापारनीतीने, रोजगारवृद्धीने ब्रिटनचे भले केले म्हणून त्यांना तो व्यापार उत्तम ठरला. पण त्याच व्यापाराने हिंदुस्थानातील रोजगार मारला म्हणून तो व्यापार हिंदुस्थानला अहितकारकच नव्हे तर विनाशाकडे नेणारा ठरला.

या आपल्याच नजिकच्या गतकाळातील इतिहासावरुन एक गोष्ट आपण मनात नोंदविली पाहिजे की आंतरराष्ट्रीय व्यापार ही गोष्ट सहजपणे दुर्लक्ष करावे अशी कमी महत्वाची नाही. सरकारने तर त्याची धोरणे आखतांना परिणामांची शहानिशा करुनच निर्णय घ्यायला हवेत. परंतु सामान्य माणसानेही हा विषय आपल्या अवाक्यातला नाही किंवा आपल्या दैनंदिन जीवनाशी तो संबंधित नाही, असे मानता कामा नये. समाजकार्यकर्त्यांनि तर, कर्तव्यभावनेने, त्याचे बरे-वाईट परिणाम समजावून घेऊन योग्य दिशेने लोकांचे प्रबोधन केले पाहिजे.

आपण आता या, हिंदुस्थानच्या गुलामगिरीच्या काळाकडून स्वतंत्रतेच्या काळाकडे येऊ या.

ब्रिटिश काळात हिंदुस्थानची राजकीय सत्ता ब्रिटनच्या हाती असल्यामुळे जी काही आर्थिक धोरणे आखली जात असत, अंमलात आणली जात असत, ती मूलतः ब्रिटिश अथवा ब्रिटनधार्जिणीच असत हे उघड आहे.

त्यामुळे एकोणिसाव्या शतकातील आणि विसाव्या शतकातील समाज चिंतकांनी नि राजकीय नेतृत्वाने अशी भूमिका घेतली की, ब्रिटिशांचे भारताच्या मानेवरील राजकीय सत्तेचे जोखड दूर केल्याशिवाय, आपली धोरणे आपण ठरवायला लागल्याशिवाय, या देशाचे नि त्यातील कोट्यावधी लोकांचे भले होणे कदापिही शक्य नाही. या भूमिकेतून आपली राजकीय चळवळ विलक्षण फोफावली आणि त्याची परिणती अखेर, दुसऱ्या महायुद्धानंतर, देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीत झाली.

## ब्रिटिशांचा वारसा

स्वातंत्र्यक्षणाला देशाला ब्रिटिशांनी ठेवलेला वारसा हा, वाढत्या दारिद्र्याचा होता. स्थानिक पातळीवरील खेड्यांतील रोजगारविनाशाचा होता. हा वारसा पाश्चात्य देशांना वरदान ठरलेल्या अभिजात अर्थशास्त्राचा होता आणि त्याचबरोबर पाश्यात्य संस्कृतीच्या मानसिक गुलामगिरीचाही होता. थोडक्यात हा देश एकीकडे खंगलेल्या भौतिक परिस्थितीचा होता तर दुसरीकडे पाश्चात्य संस्कृतीने रंगलेल्या मानसिक स्थितीचा होता.

देशाच्या सुमारे दोन शतके चाललेल्या, नैसर्गिक साधनसंपत्तीच्या लुटीतून देशाची आर्थिक स्थिती विपन्नतेला गेली होती आणि वसाहतवादी व्यापारनीती हे त्याचे प्रमुख कारण होते. या सर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरही आपली निर्यात ही प्रामुख्याने प्राथमिक क्षेत्रातील मालाचीच राहिली आहे. अन्नवस्तू आणि कच्च्या मालाच्या निर्यातीमुळे, लोकांना मूळ गरजेच्या वस्तूंची कमतरता जाणवते किंवा उपलब्धता असलीच तर ती बहुसंख्यांना परवडण्यासारखी नसते. याचा एक दृश्य परिणाम म्हणजे सामान्यांची दारिद्र्यवृद्धी.

या परिस्थितीत भर पडते ती, देशाच्या असंख्य खेड्यांना, मूलभूत गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्ण राखणाऱ्या, परंपरागत रोजगारांच्या विनाशाने. ब्रिटिशांच्या वस्तूंच्या स्पर्धेत टिकता न आल्यामुळे येथील लहान रोजगारांची, कुटीरोद्योगांची दयनीय अशी अवस्था झाली. कौटुंबिक रोजगार नाहीसे झाले. आणि शेतीवर अतिरिक्त भार पडूनही बेकारांची, शेतमजुरांची संख्या वाढू लागली.

परदेशी मालाच्या वास्तविक प्रभावाइतकाच त्याचा मानसिक प्रभावही

हिंदुस्थानच्या दुरवस्थेला कारण ठरला. परदेशी वस्तू या भारतीय वस्तूंच्या तुलनेत लोकांना हव्याशा वाटू लागल्या आणि स्वातंत्र्यानंतरही त्या तशाच वाटत राहिल्या हीच या संदर्भातील मानसिक गुलामगिरी होय.

## रिकार्डोचे आंतरराष्ट्रीय व्यापारतत्व

हा अलीकडचा इतिहास असेही सांगतो की, आंतरराष्ट्रीय व्यापार हा कायमच श्रीमंत राष्ट्रांना फायदेशीर आणि गरीब राष्ट्रांना नुकसानीचा ठरत आला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात तर हे घडलेच पण स्वातंत्र्योत्तर काळातही हे असेच घडत राहिले आहे, ही आपल्या चिंतेची बाब आहे.

वास्तविक, सैद्धांतिक सनातन अर्थशास्त्रानुसार, आंतरराष्ट्रीय व्यापार हा, तो करणाऱ्या दोन्हीही राष्ट्रांना, फायदेशीर ठरतो. हे डेव्हिड रिकार्डोने प्रथमतः प्रभावीरीतीने मांडले आणि रिकार्डोनंतर पावणेदोन शतके ओलांडली तरी त्याच आधारावर, प्रत्येक राष्ट्र हिरिरीने आंतरराष्ट्रीय व्यापारात उतरत आहे, व इतरांवर सरशी करण्याचा प्रयत्न करीत आहे. रिकार्डोने सांगितले ते सत्य होते पण त्यातले तथ्य मात्र विसरले गेले. रिकार्डोचा जो सिद्धांत परकीय व्यापाराची भलावण करतो, त्या सिद्धांताची दोन गृहिते तत्वे सतत लक्षात ठेवायला हवीत. एक म्हणजे, या खेळातील प्रत्येक राष्ट्र आपल्या पुरून उरणाऱ्या म्हणजे अतिरिक्त वस्तू दुसऱ्या राष्ट्राकडे निर्यात करीत आहे. आणि दुसरे म्हणजे, त्या वस्तू तुलनेने आपल्या राष्ट्रात स्वस्त दरात तयार होत आहेत. म्हणजे, त्या वस्तू निर्मितीचा श्रमखर्च, दुसऱ्या देशात तीच वस्तू तयार करण्याच्या श्रमखर्चापेक्षा कमी आहे. अर्थातच, या दोन्ही गृहितांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार क्षेत्रातील एकदिशा पद्धती आपण नकळत स्वीकारीत जातो. यालाच मी अभिजात अर्थशास्त्राच्या मानसिक गुलामगिरीची अवस्था असे म्हणतो.

एकूणच, गरीब राष्ट्रांच्या आजच्या परिस्थितीच्या संदर्भात, आणि त्यातही खासकरुन आजच्या भारताच्या संदर्भात या गुलामीच्या 'वारशा'चे विश्लेषण आपण करायला हवे आहे.

## नववसाहतवादाची गुलामी

भारताच्या सद्यःकालीन परिस्थितीचे एका वाक्यात वर्णन करायचे झाल्यास असे म्हणता येईल की, भारत हा देश, इतर अनेक गरीब

देशांप्रमाणेच, एका 'नववसाहतवादा'च्या गुलामीत अडकला आहे. हा मागील शतकासारखा राजकीय वसाहतवाद नसून तो निव्वळ आर्थिक वसाहतवाद आहे. आपण पूर्वीच्या राजकीय गुलामगिरीतून आपली सोडवणूक करुन घेतली. पण आजची भारतातील मानसिक परिस्थिती जर लक्षात घेतली तर असे दिसून, येते की, या आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडणे फारच दुर्लभ आहे.

जागतिक पातळीवरील, दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळाचे चित्र असे आहे की, कोणताही देश आता दुसऱ्या कोणत्याही देशाच्या राजकीय गुलामगिरीत अडकण्याची चिन्हे आजिबात नाहीत. कोणतेही एक राष्ट्र दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रावर राजकीय वर्चस्व मिळविण्याच्या मनस्थितीत नाही. याला कारण म्हणजे एकतर, आता, दुसऱ्या कुठल्या राष्ट्राचा राजकीय भार पेलणे हे कोणत्याही देशाला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. मला गमंतीने असे म्हणावेसे वाटते की, भारतातील आजची अस्थिर नि नीतीभ्रष्ट राजकीय स्थिती पाहून, जर ब्रिटिशांना, हे राष्ट्र पुन्हा ताब्यात घेण्याचे आवाहन करायचे, असे आपण म्हटले तरी ब्रिटिश लोक त्याला नकार देतील. ब्रिटनच काय पण कोणतेही श्रीमंत राष्ट्र या गोष्टीस पुढे येणार नाही. अर्थात, याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, असे राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याची गरजच नाहीशी झालेली आहे. आपण ब्रिटिश काळाचा भारताचा संदर्भ पुन्हा येथे विचारात घेतला तर असे लक्षात येईल की, पूर्वीही ब्रिटिशांना राजकीय सत्तेत रस नव्हता. त्यांना ती अपरिहार्यपणे हस्तगत करावी लागली कारण राजकीय सत्ता हे आर्थिक सत्तेचे साधन होते. त्यांच्या वसाहतवादी व्यापार नीतीच्या निर्वेध सातत्यासाठी राजकीय वर्चस्वाच्या अस्तित्वाची त्यावेळी त्यांना गरज होती.

आज आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिस्थिती पूर्णतः बदललेली आहे. आज, महायुद्धोत्तर जगाचे, श्रीमंत आणि गरीब राष्ट्रांत विभाजन झाले आहे. गरीब राष्ट्रांची गरिबी अल्प प्रमाणात कमी होत असून (आणि काही देशांत नि काही काळांत ती वाढतच असून), श्रीमंत राष्ट्रांची संपन्नता मात्र अधिक वेगाने वाढत आहे. परिणामतः श्रीमंत नि गरीब राष्ट्रांतील भौतिक समृद्धीच्या संदर्भातील अंतर सातत्याने वाढतच आहे. आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावरही अशातऱ्हेची भेदकारक परिस्थिती आहे.

## प्रश्न आमचे – उत्तर पाश्च्यात्यांकडे

आज गरीब राष्ट्रांचे, म्हणजे ज्यांना, त्यांच्या स्वाभिमानजागृतीसाठी आपण विकसनशील राष्ट्रे असे संबोधतो त्या राष्ट्रांचे, अत्यंत तीव्र असे प्रश्न आहेत. आणि अडचण अशी आहे की त्यांची उत्तरे, श्रीमंत राष्ट्रांकडे नि त्यांचेच वर्चस्व असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडे आहेत. असे ही तथाकथित विकसनशील राष्ट्रेही मानीत आहेत. त्यामुळे प्रश्न आमचे पण ते सोडवण्याचा मक्ता बऱ्याच अंशी पाश्चांत्यांकडे देऊन, आम्ही एकीकडे त्या राष्ट्रांप्रत पोचण्याची स्वप्ने पाहत आहोत, आणि दुसरीकडे, आमच्या बाबतीतल्या आमच्याच प्रयत्नांच्या संदर्भात गाफील राहत आहोत. पाश्चात्य अभिजात अर्थशास्त्राच्या मुशींतून घडलेल्या तज्ञांच्या नि नेत्यांच्या हाती देशाचे भवितव्य देऊन आपण आपली फसवणूक करवून घेत आहोत असे वाटावे, अशीच आजची परिस्थिती आहे.

सतराव्या शतकाच्या सुरुवातीस औद्योगिक संघटनेच्या क्षेत्रात 'संयुक्त भांडवली संस्थे'चा उदय ही एक क्रांतीकारक घटना होती. तिने जगात इतिहास घडविला. औद्योगिक क्रांतीला वेग दिला. अशाच ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्थानवर वर्चस्व प्रस्थापित केले. हिंदुस्थानला गुलामीत बद्ध केले. आज या 'संयुक्त भांडवली संस्थे' ची पुढील विकासावस्था 'बहुराष्ट्रीय कंपनी' च्या रुपाने, अशाच गरीब राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचा घास घेताहेत. तिला उपयुक्त असे वातावरण जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय चलनसंस्थेसारख्या संस्था निर्माण करीत आहेत. गरीब राष्ट्रांची औद्योगिक धोरणे आणि व्यापार धोरणे ही तिची साधने आहेत. आणि श्रीमंत देशांचे गरीब राष्ट्रांवरील कायम स्वरुपाचे आर्थिक वर्चस्व प्रस्थापित करणे हे तिचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट कसे साध्य केले जाते ते आपण शोधून काढले पाहिजे, आपल्याला त्याचे आकलन झाले पाहिजे.

## आर्थिक परावलंबित्व

हे आकलन करुन घेण्याकरिता आपण परत स्वातंत्र्योत्तर भारतीय इतिहासाकडे वळले पाहिजे. विशेषत: आर्थिक घटनांकडे लक्षपूर्वक पाहिले पाहिजे. १९५० साली नियोजन मंडळाची स्थापना करुन, स्वातंत्र्यानंतर लागलीच, आपण देशात नियोजनबद्ध विकासाची प्रक्रिया सुरु केली.

या वेळची एक छोटीशी घटना सांगायला हवी. गोष्ट १९५१ सालची आहे. नव्यानेच निर्माण केलेल्या नियोजन आयोगाने, भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला होता. त्यावर अखेरचा हात फिरवण्यापूर्वी, नेहरूंना असे वाटले की, त्याला विनोबांचे सहकार्य व समंती मिळवावी. नेहरूंनी विनोबाजींना पत्र धाडून दिल्लीस बोलावले. नियोजन मंडळाच्या सदस्यांशी चर्चा करण्यासाठी.

विनोबाजींनी होकार कळवला आणि पवनारहून नवी दिल्ली असे आठशे मैल ते पदयात्रा करीत गेले, आणि दोन महिन्यांनी दिल्लीला पोचले. देशाच्या आर्थिक नियोजनाला वास्तवरुप प्राप्त होण्यासाठी, प्रत्यक्ष देश चालून अनुभव गोळा करण्याचा विचार या पदयात्रेमागे असावा, असे म्हणता येईल.

नियोजनमंडळाबरोबर विनोबाजींची तीन दिवस चर्चा झाली. या चर्चेचे सार सांगताना ते म्हणाले, "नियोजन मंडळ काय किंवा मी स्वत: काय दोघेही मूलत: भारतीय जनतेच्या कल्याणाचाच विचार करीत असलो तरी आमच्या मूलभूत दृष्टिकोणांतच फरक आहे." पुढे त्यांनी स्वत:चा दृष्टिकोण सांगताना दोन गोष्टींवर भर दिला. एक म्हणजे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करणे आणि दुसरे म्हणजे सर्वांना रोजगार देणे. नियोजनाच्या सुरवातीपासूनच. भारतीय नियोजनाचा, नियोजन मंडळाचा आणि नेहरूंचा मार्ग भिन्न होता.

शेतीपेक्षा उद्योगवाढीवर भर देण्याची आपली व्यूहरचना होती. यातही खाजगी क्षेत्रापेक्षा सरकारी क्षेत्रावर आपण उद्योगविकासाची जबाबदारी अधिक दिली. कुटिरोद्योग व खेड्यांतील पारंपरिक कुटुंबोद्योगांचे पुनरुज्जीवन यापेक्षा, शहरांतून मोठ्या उद्योगांच्या स्थापनेवर आपला भर राहिला.

आज अन्नधान्याच्या बाबतीत देश बराचसा स्वयंपूर्ण आहे. परंतु दुसरी, सर्वांना रोजगार देण्याची गोष्ट, तात्त्विक पातळीवर प्राधान्याने कधीच स्वीकारली गेली नाही आणि त्यामुळे व्यावहारिक पातळीवर ती कधीच शक्य झाली नाही. परिणामत: पहिली गोष्ट असूनही नसल्यासारखी झाली. म्हणजे असे की, धान्याच्या बाबतीत आपण स्वयंपूर्ण झालो याचा अर्थ, आपल्याला वर्षभराच्या पुरवठ्यासाठी, अलीकडे, परदेशांकडून आयात करावी लागत नाही. एवढेच. मात्र त्याचा अर्थ, सर्वांना अन्न मिळतेच,

असा नाही. आजही भारतात दर मिनिटास अठरा बालके अन्नावाचून किंवा पुरेशा अन्नावाचून नि कुपोषणाने मृत्यूमुखी पडतात. कारण अन्न निर्माण होणे वेगळे आणि ते सर्वांच्या पदरी, पुरेशा प्रमाणात पडणे वेगळे.

अन्न मिळविण्यासाठी ते खरेदी करावे लागते. आणि खरेदी करण्यासाठी खरेदीशक्ती म्हणजे पैसा लागतो. हा पैसा सातत्याने मिळत राहण्यासाठी कायमस्वरुपी रोजगार असावा लागतो. "सर्वांना रोजगार" हे उद्दिष्ट साध्य झाले तरच सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टी मिळून बेकारी, दारिद्र्य यांचे निमूर्लन होऊन शोषण आणि विषमता या गोष्टी कमी होतात.

परंतु देशातील नियोजनाची दिशा सुरवातीपासूनच ही राहिली नाही. प्रगतीची सुरूवात मोठ्या उद्योगांपासून केल्यामुळे, साहजिकच, मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक होऊनही देशाची रोजगारक्षमता मर्यादित राहिली. शिवाय आपल्याला सुरुवातीपासूनच अजूनही तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री नि भांडवल आयातीची कांस धरावी लागली. इथेच आपल्या आंर्थिक परावलंबित्त्वाची सुरुवात झाली. श्रीमंत राष्ट्रे आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था आपल्याला मदत करायला नेहमीच पुढे सरसावल्या. आपणही नि:संकोचपणे नव्हे, निश्चिंतपणे त्यांची वाढत्या प्रमाणावर मदत घेतच गेलो. सुरवातीस गरज म्हणून मदत घेतली. मग सवयीने मदत घेतच राहिलो. आणि आता तर मदतीचे आपल्याला व्यसनच लागले आहे. त्यातून सुटका होणे कठीण ठरत आहे. आज आपली परकीय कर्जेच एक लाख कोटी रुपयांच्या घरात पोचली आहेत. मूळ मुद्दल तर राहोच पण त्यावरचे व्याज फेडण्याची कुवत भारतीय अर्थव्यवस्थेत राहिली नाही. कर्ज फेडण्यासाठीही कर्ज घेण्याची वेळ आली. या दृष्ट चक्रात आपण कसे अडकलो आणि त्याचे परिणाम काय होताहेत ते पाहू या.

आपल्या विकासासाठी आपण आधुनिक औद्योगिकरणापासून सुरवात केल्यामुळे आपणास परकीय देशांतून तंत्र,-यंत्र आयात करावे लागले. त्यासाठी परकीय चलनाची गरज होती. वास्तविक स्वातंत्र्याच्या वेळी आपण थोडीफार परकीय चलनाची गंगाजळी जवळ बाळगून होतो. पण पहिल्या योजनेच्या अखेरपर्यंत आपण ते संपुष्टात आणले. तेव्हापासून मग परकीय चलनाच्या तुटीची परिस्थिती निर्माण झाली. ती पुढे आजतागायत टिकून राहिली, एवढेच नव्हे तर तीव्र होत गेली.

## निर्यात म्हणजे देशभक्ती

आपल्याला नेहमीच वाढत्या प्रमाणावर आयात करावी लागत होती. साहजिकच वाढत्या प्रमाणात परकीय चलनाची गरज भासत होती. परकीय चलन प्राप्तीचा व्यवहारात एकच मार्ग असतो. तो म्हणजे निर्यात वाढवणे. सरकारने वेळोवेळी निर्यातवाढीचा इतका आग्रह धरला की निर्यातीलाच देशभक्तीचे स्वरुप आले. निर्यात हा कर्तृत्वाच्या परवलीचा शब्द ठरू लागला. क्रमिक पुस्तकांतून निर्यात वाढीचेच अर्थशास्त्र शिकविले जाऊ लागले. आणि निर्यातवाढीला सवलत, बक्षीसे, सन्मानांचे प्रलोभन दिले जाऊ लागले.

आयात-निर्यातीच्या अर्थशास्त्रात असेही सिद्धांत मांडले जाऊ लागले की, विकसनशील राष्ट्रांची निर्यातही प्राथमिक म्हणजे शेती-संबंधित व निसर्गनिर्मित वस्तूंचीच असते. खरे तर ती तशीच असणे ही विकसित राष्ट्रांची गरज होती. अजूनही त्यांना शेतवस्तू, खनिजवस्तू, कच्चा माल म्हणून हव्या होत्या. परिणामतः आमच्या देशातील विकास धोरणे शेतीच्या दिशेने वळू लागली. निर्यातीसाठी शेतीविकास हे एक नवे परिमाण शेतीक्षेत्रात रुजविले गेले. आणि मग निर्यातवृद्धी हे ध्येय उराशी कवटाळून जे जे निर्यातयोग्य सापडेल ते ते पिकविण्याचा सल्ला दिला जाऊ लागला. लोहमृतिकेपासून फळे-भाज्यापर्यंत सगळेच निर्यातयोग्य ठरु लागले. ठाणे जिल्हयातील सर्व बेडूक तर निर्यात झालेच, पण चेंबर ऑफ कॉमर्सच्या एका तज्ञाने तर आपला असाही 'महत्वपूर्ण' अभ्यास प्रसिद्ध केला की, ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जमिनी उच्च दर्जाचा भात पिकविण्यास योग्य आहेत आणि तो भात निर्यात करुन खूप परकीय चलन प्राप्त करता येईल. अर्थात, या परकीय चलनातून इथल्या आदिवासींचे पोट कसे भरेल ते त्याच्या अभ्यासात आले नव्हते.

देशाला आता निर्यात रोगाने पछाडले असल्यामुळे त्याची अर्थशास्त्रीय शहनिशा करण्याची वेळ आता आली आहे. या "परकीय कर्ज-परकीय चलन-निर्यात" चक्रात अडकविण्याचे दीर्घकालीन दुष्परिणाम नेमकेपणाने समाजापुढे मांडले जायला हवेत.

## निर्यातीचे पर्यावरणीय परिणाम

आयात-निर्यात व्यवहार दोन्ही संबंधित राष्ट्रांना फायदेशीर ठरण्यासाठी त्यांनी आपल्याकडून अतिरिक्त (गरजेपेक्षा जादा) उत्पादन होऊ शकणारी वस्तू निर्यात करायला हवी असा रिकार्डोचा संकेत आहे. पण प्रत्यक्षात आज देशात ज्यांचा पुरेसा पुरवठा नाही अशा वस्तूही आपण उपयोगातून काढून निर्यातीकडे वळवतो आहोत. परिणामत: त्या वस्तूंची अधिकच टंचाई होऊन, भाववाढ होऊन, अनेकांना त्यांच्या उपभोगापासून वंचित व्हावे लागते. शिवाय असा उपभोगातून वगळला जाणारा वर्ग हा नेहमीच आर्थिकदृष्ट्या गरीब वर्ग असतो. भाज्या-फळे अरब राष्ट्रांना आपण निर्यात करीत राहू तर इथल्या अधिकाधिक लोकांना आपण या वस्तूंच्या उपभोगाबाहेर ढकलत राहू हे उघड आहे. खरे तर यालाही हरकत नाही, पण या वस्तूंच्या निर्यातीतून जे परकीय चलन प्राप्त होते, त्याचा वापर करुन ज्या वस्तू आयात केल्या जातात त्याचा लाभ कुणाला मिळतो ? तो या, तुलनेत गरीब असणाऱ्या वर्गाकडे वळतो काय ? एक गोष्ट स्पष्ट आहे की, अजून तरी हा लाभ देशातील संघटित क्षेत्रांतील उद्योगांकडे व त्यातील व्यक्तींकडे जातो. म्हणजे पर्यायाने खेड्यांकडून शहरांकडे, गरिबांकडून श्रीमंतांकडे, असंघटित वर्गाकडून संघटित वर्गाकडे हा उत्पन्न प्रवाह वळतो आणि निर्यात हे त्याचे साधन ठरते असे घडत नाही का ?

या निर्यात प्रक्रियेत आणखीही काही परिणाम दिसून येतात. एक म्हणजे, भाज्या-फळे यांच्या निर्यातीमुळे आणि अनेकजण त्यांच्या उपभोगातून वगळले गेल्यामुळे ते पोषक अन्नाला वंचित होतात आणि त्याचे अनारोग्यकारक दूरगामी परिणाम त्यांच्यावर व त्यांच्या पुढील पिढ्यांवर घडून येत असतात.

दुसरे असे की, समजा आपण काही हजार हेक्टर जमिनीवरील उत्पादन परकियांना विकले तर त्याचा एक अर्थ असा होतो की, येवढी जमीन आपण भारतियांसाठी न वापरता परदेशाला बहाल केली आहे. आणि जमीन हे दुर्मिळ उत्पादनसाधन आहे हे लक्षात घेतले की या घटनेचे गांभीर्य कळून येईल.

तिसरा परिणामही असाच आहे. शेतीउत्पादित वस्तूंच्या निर्यातीवर भर दिला की, विविध वस्तूंच्या उत्पादनाखालील जमीन विशिष्ट निर्यातयोग्य

वस्तूंच्या उत्पादनाकडे वळविली जाते. शेकडो हेक्टर्स जमिनीवर एकाच वस्तूचे सातत्याने उत्पादन घेऊन जमिनीचा कस कायमचा कमी होतो. एक पीक पद्धती (Monocultural System) मुळातच निसर्गाला मान्य नाही. त्याचे पर्यावरणीय परिणाम दिसू लागतात. त्यातच जमिनीचा कमी होणारा कस भरुन काढण्यासाठी आणि अधिक उत्पादनासाठी रासायनिक खतांचा मोठा वापर जमीनीवर केला जातो. परिणामत: अहितकारक पर्यावरणीय परिणाम अधिक तीव्र होतात. शिवाय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी निर्यात उद्योग हा हळूहळू भांडवलप्रधान उद्योग बनत जातो आणि त्याची रोजगार-प्रधानता कमी कमी होत जाते. हा एक वेगळाच सामाजिक-आर्थिक अनिष्ट परिणाम घडून येतो.

'परकीय कर्ज-परकीय चलन-निर्यात' या दुष्टचक्राचे असे शेतजमीन विनाशाचे पर्यावरणीय परिणाम आपण सोसतो आहोत याची फारशी दखल शासकीय अर्थतज्ञ घेत नाहीत, आणि पारंपरिक अर्थशास्त्रही घेत नाही, हे आपले दुर्दैव आहे.

## आर्थिक नव-वसाहतवाद

आजच परिस्थिती पुरेशी बिघडलेली आहे. 'आयात अति आणि निर्यात मंदगती' या पेचात आपला व्यवहारशेष कायम प्रतिकूल राहिला. निर्यातीच्या मर्यादेत आयात न राखता, आयातीच्या गरजांसाठी निर्यातीला प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे ही परकीय चलनाची न पेलवणारी देणी तर निर्माण झालीच, पण ही तूट भरून काढण्यासाठी उभारलेल्या परकीय चलनाच्या कर्जात, देश कायमचा अडकला. ही परकीय मदत देऊ करणाऱ्या श्रीमंत राष्ट्रांचा नि आंतरराष्ट्रीय चलन संस्थांचा तो मिंधा झाला. आता तर, देशाला स्वत:ची औद्योगिक धोरणे, व्यापारविषयक धोरणे, चलन विषयक धोरणे ठरविण्याचे स्वातंत्र्यही राहिले नाही. परकीय सत्तांनी भारताच्या आर्थिक नाड्या आपल्या नियंत्रणाखाली आणल्या आहेत. आणि यालाच आपण "आर्थिक नव-वसाहतवाद" म्हणतो आहोत. ही भारताची दुसरी गुलामी आहे.

आपल्या आजच्या परकीय चलनाच्या अडचणी सोडविण्यासाठी पाश्चात्य राष्ट्रे आपल्याला अधिक प्रमाणात सहाय्य देऊ इच्छितात, आणि

त्यातून आपल्याला परावलंबित्वाच्या पाशात अधिक गुंतवून ठेवतात असे हे उफराटे अर्थशास्त्र आहे.

## निसर्गाचे मूल्य

आपण पुन्हा रिकार्डोच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दुसऱ्या संकेतांकडे वळू या. रिकार्डोने असे म्हटले होते की, ज्या वस्तूच्या संदर्भातील तौलनिक उत्पादन खर्च कमी आहे त्या वस्तूच्या उत्पादनातून आणि निर्यातीतून आपल्याला लाभ आहे. रिकार्डो काय किंवा त्याच्यानंतरचे आजतागायतचे सर्व देशी-विदेशी अर्थतज्ज्ञ काय, ते, नैसर्गिक साधने ही मोफत प्राप्त झालेली देणगी आहे असे मानतात. परंतु वाढत्या उपयोगाबरोबर आणि वाढत्या दुर्मिळतेबरोबर नैसर्गिक साधनांनाही मूल्य येते आणि ते वेगाने वाढत जाते ही घटना विचारात घेतली जात नाही. जमिनीची होणारी धूप थोपविणे, नाश झालेल्या जंगलांचे पुनर्संवर्धन करणे, पाण्याचे दुषितीकरण थोपविणे किंवा दूर करणे या सर्वांसाठी पुढील काळात वाढत्या प्रमाणात भांडवली खर्च करावा लागणशर आहे. पण त्याची मोजदाद उत्पादनखर्चातही केली जात नाही आणि राष्ट्रीय उत्पन्नातही केली जात नाही. परिणामत: वस्तूचा उत्पादन खर्च आहे त्यापेक्षा कमी भासतो आणि राष्ट्रीय उत्पन्न मात्र आहे त्यापेक्षा जास्त फुगलेले दिसून येते. थोडक्यात, असे दाखवून देता येईल की, हिशोबांत आणि किंमतींत भौतिक भांडवलाचा घसारा विचारात घेतला जातो, परंतु भूमीसारख्या नैसर्गिक साधनांचा घसारा मात्र धरला जात नाही. आणि त्यामुळे आपण निर्यात करीत असलेल्या वस्तू कदाचित् (हा घसारा विचारात घेऊन हिशेब केला तर) नुकसानीतच परकीयांना विकतो आहोत असे दिसून येईल. शिवाय सरकारही अनेकदा जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी दुहेरी किंमतींचे धोरण आखते. म्हणजे असे की, समजा अंतर्गत बाजारपेठेत आपली साखर आठ रुपये किलो दराने विकली जात असेल तर तीच आंतरराष्ट्रीय बाजारात कमी किंमतीत म्हणजे, समजा, पाच रुपये किलोने विकायची, आणि यातून येणारा घाटा एकतर सरकारने, साखर कारखान्यांना अर्थसाह्य (Subsidy) देऊन सोसायचा, किंवा अंतर्गत बाजारात जास्त किंमत ठेऊन तो देशी ग्राहकांना सोसायला लावायचा. या दोन्ही मार्गांनी आपल्या देशाचे भरपूर नुकसान होत असते. त्यातही ते गरिबांचे अधिक होते.

भारतासारख्या अल्पविकसित राष्ट्राने तर नैसर्गिक साधनसामुग्री मूल्यविहीन आहे असे मानणे म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. अजूनही आपल्या देशात, रोजगारवाढीची आणि उत्पन्नवाढीची क्षमता, जर कोठे असेल तर ती या नैसर्गिक साधनसामुग्रीच्या क्षेत्रात आहे. दिवसेंदिवस, औद्योगिक क्षेत्र हे, परकीय स्पर्धेच्या विचारातून भांडवल-प्रधानच होत जाणार आहे. त्यामुळे रोजगारवाढीला तिथे अंगभूत मर्यादाच आहेत. त्यामुळे देशातील रोजगार निर्मितीसाठी आणि दारिद्र्य निवारणासाठी आपल्याला नैसर्गिक साधनसामुग्रीच्या, नैसर्गिक क्षेत्राच्या विकासाकडे म्हणजेच, विकासाच्या पर्यायी नीतीकडे वळावे लागेल. या संदर्भात, महात्मा गांधींनी दर्शविलेल्या दिशेचा विचार अपरिहार्य ठरतो.

## स्वयंपूर्ण स्वावलंबी खेडे

गांधीजींनी खेड्यांच्या विकासाचे सूत्र देऊन ठेवले आहे. आजच्या ग्रामीण भागांच्या, त्यातील जनतेच्या दोन महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करण्याचे सामर्थ्य त्यात आहे. गांधीजींनी स्वयंपूर्ण खेड्याची संकल्पना मांडली आहे. त्यातील आशय महत्त्वाचा आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी खेड्याने स्वयंपूर्ण असले पाहिजे आणि शोषण निर्मूलनासाठी खेड्याने स्वावलंबी असले पाहिजे. हा तो आशय आहे. गावातील नैसर्गिक साधनसामुग्री आणि गावातील श्रम यांची सांगड घालून, गावाच्या शक्य तितक्या गरजा-निदान मूलभूत गरजा-गावपातळीवर भागवता आल्या तर गावातील जनता दारिद्र्यमुक्त व शोषणमुक्त होऊ शकेल. यासाठी करावयाचे नियोजन हे अर्थातच रोजगाराभिमुख असेलच पण ते पर्यावरणाच्या मर्यादांचा विचारही करील. श्रममूल्याबरोबरच नैसर्गिक साधनांचेही मूल्य, त्यात, विचारात घेतले जाईल. आणि मग वाढत्या उत्पादनातून अतिरिक्त मालाच्या निर्यातीचा नि गावातील लोकांच्या अतिरिक्त गरजांच्या आयातीचा विचारही त्यात सुसंगतरित्या येईल.

(दि. १२ फेब्रुवारी १९९२ रोजी, बोर्डी जि. ठाणे, येथील सर्वोदय मेळाव्यात दिलेले व्याख्यान, विस्तारित स्वरुपात.)

## "ग्रामीण विकासाची गांधीप्रणीत सप्तपदी"

डिसेंबर १९३६ मध्ये भारतीय काँग्रेसचे पन्नासावे सुवर्णमहोत्सवी अधिवेशन फैजपूर येथे भरविण्यात आले. खेड्यातले, काँग्रेसचे हे पहिलेच अधिवेशन. त्यात शेतीसुधारणांविषयीचा झालेला ठराव आणि विकेंद्रित अर्थव्यवस्थेवरील भर सूचित करणारे ग्रामोद्योगांचे प्रदर्शन व सजावट या गोष्टी वैशिष्ट्यपूर्ण तर होत्याच, पण महात्मा गांधींच्या विचारांची खेड्यांकडे वळलेली दिशा स्पष्ट करणाऱ्याही होत्या. या अधिवेशनाचा हेतू केवळ राजकीय चळवळीचे अधिष्ठान शहरांकडून खेड्यांकडे नेण्याचा होता असे नाही, तर विकासाची, आर्थिक व सामाजिक चळवळ आणि देशातील लोकांचा मानसिक रोख, खेड्यांच्या सुधारणेकडे आणि खेड्यांवर आधारित अशा समाजरचनेकडे वळवावा असाही हेतू होता.

महात्मा गांधी, यंग इंडिया व हरिजन मधून १९१९ सालापासून तुटकपणे पण सातत्याने आणि विविध अंगांनी खेड्याविषयी लिहित असले तरी फैजपूर काँग्रेसच्या आसपासच्या काळात 'खेड्यांचा भारत' त्यांच्या मनात अधिकाधिक मूळ धरू लागला होता हे स्पष्ट दिसून येते. गांधीजींच्या जीवनातील, या काळातील, महत्त्वाच्या घटना याची साक्ष देतील.

१७ सप्टेंबर १९३४ ला गांधीजींनी जाहीर केले की, १ ऑक्टोबर (१९३४) पासून ते राजकारणातून निवृत्त होऊन, ग्रामीण उद्योगांचा विकास, हरिजनसेवा आणि मूलोद्योगातून शिक्षण या गोष्टींना वाहून घेतील.

२६ ऑक्टोबरला महात्मा गांधींनी, त्यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचे उद्घाटन केले.

३० एप्रिल १९३६ ला, गांधीजींनी शेगांव या वर्ध्याजवळच्या खेड्यात – सेवाग्रामला – स्वतःचा मुक्काम, कायम वास्तव्यासाठी म्हणून हलवला.

२८ ते ३० डिसेंबर १९३६ फैजपूरचे खेड्यातील पहिले काँग्रेस अधिवेशन.

२२ ऑक्टोबर १९३७ ला वर्धा येथील शिक्षणविषयक अधिवेशनाचे अध्यक्षपद स्वीकारून त्याकरवी 'मूलोद्योगातून शिक्षण' पद्धतीची आखणी केली.

गांधीजींनी अधिकाधिक लक्ष खेड्यांच्या प्रश्नांकडे व विकासाकडे

वळविले यांच्या निदर्शक अशा या घटना आहेत. याच काळात 'हरिजन' मधून, खेड्यांच्या सुधारणेविषयीचे आपले अनेक विचार ते मांडतच होते ; शिवाय अनेकांना खेड्याकडे वळायला सांगून, ग्रामीण सुधारणेचे स्वयंसेवी तंत्रही ते विकसित करू पाहत होते.

या सर्व प्रयत्नांतून, गांधीजींनी, खेड्यांच्या विकासाची गरज आणि त्यासाठी करावयाच्या कार्याची दिशा स्पष्ट केली आहे. खेड्यांच्या पुनर्निर्माणाविषयीच्या आचार-विचारांची महत्त्वाची तत्त्वे अशी होती :–

१. भारत हा खेड्यांचा देश आहे.
२. खेड्यांचे प्रश्न व परावलंबित्व.
३. 'स्वयंपूर्ण खेड्या'ची संकल्पना.
४. ऊर्ध्वगामी नियोजन.
५. स्वेच्छा प्रयत्न.
६. समग्र ग्रामसेवकाची संकल्पना.
७. 'आदर्श खेड्या'ची संकल्पना.

गांधीजींचे ग्रामीण पुनर्निर्माणाविषयीचे विचार पूर्णांशाने समाविष्ट करणारी ही 'सप्तपदी' सविस्तरपणे पाहिली तर त्यातून या विचारांची भारताच्या आजच्या परिस्थितीत असलेली उपयुक्तता तसेच आजच्या परिस्थितीच्या संदर्भात या विचारांचा करावयाचा विस्तार व विकास ध्यानात येऊ शकेल.

गांधीजींच्या एकूण लेखनसागरात ग्रामीण विकासाचा प्रबंध सुसंगतपणे मांडलेला नाही. पण प्रसंगोपात्त व्यक्त केलेल्या विचारांतून आणि तुटकपणे पण सातत्याने व कित्येकदा पुनरावृत्तीने केलेल्या लेखनांतून, भारतीय खेड्यांच्या दुर्दशेची मीमांसा, भारताचे भवितव्य घडविण्याच्या प्रयत्नातील खेड्यांचे स्थान, त्यांची स्वयंपूर्ण खेड्याची आणि आदर्श खेड्याची संकल्पना आणि या दिशेने जाण्याचा स्वयंसेवी मार्ग या गोष्टी सुस्पष्ट झालेल्या आहेत.

### १. भारत हा खेड्यांचा देश आहे.

सात नोव्हेंबर १९२९ च्या 'यंग इंडिया' मध्ये गांधीजींनी लिहिले आहे, "आपण ग्रामीण संस्कृतीचे वारसदार आहोत. आपल्या देशाचा विस्तार,

आपल्या लोकसंख्येचा विस्तार आणि देशाचे हवामान हे माझ्या मते, ग्रामीण संस्कृतीचे निदर्शक आहेत.'' याच आशयाचा एक विचार गांधीजींनी आपल्या 'दैनंदिन विचारात'त दिलेला आहे. ते म्हणतात, ''ज्याप्रमाणे जे पिंडी ते ब्रह्मांडी आहे, त्याप्रमाणे खेड्यात हिंदुस्थान आहे.'' (१२-७-४५) हाच विचार वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या संदर्भात मांडलेला आढळतो. दुसऱ्या एका संदर्भात गांधीजी लिहितात, ''भारत हा त्याच्या सात लाख खेड्यांमधून वास करून आहे. ज्याची लोकसंख्या काही शेकड्यात मोजता येईल अथवा काही खेड्यांच्या बाबतीत क्वचित शंभरापेक्षाही कमी भरेल अशी अडचणीची, दुर्गम प्रदेशात वसलेली, छोटी छोटी अशी ही खेडी आहेत. अशा एखाद्या खेड्यात जाऊन राहणे मी पसंत करीन. कारण ही खेडी हाच खरा भारत आहे, माझा भारत आहे, की ज्याच्यासाठी माझा जन्म आहे.'' (हरिजन २६-५-४६)

उपरोक्त विधानांवरून लक्षात येईल की, गांधीजींच्या मते, भारत हा सर्वस्वी खेड्यांचा देश आहे. ''आपण ग्रामीण संस्कृतीचे वारसदार आहोत'' असे म्हणताना गांधीजी इतिहास दृष्टीसमोर ठेवीत असतात. त्यांच्यापुढचा प्रश्न हा तत्कालीन ३० कोटी लोकांचा आणि सुमारे ७ लाख खेड्यांचा प्रश्न होता. आज हा थोड्या कमी संख्येच्या खेड्यांचा पण दुपटीपेक्षाही अधिक लोकसंख्येच्या भारताचा प्रश्न आहे.

''१९८१ च्या शिरगणतीनुसार ७५ कोटी नागरिकांच्या या देशाची ७६ टक्के लोकसंख्या सुमारे ५ लाख ७६ हजार खेड्यातून राहत आहे. संपूर्ण आयुष्यभर गांधीजींनी ग्रामीण पुनर्निर्माणाचा आग्रह सातत्याने धरला आहे. त्याचा विश्वास होता की, खेड्यांचा विनाश झाला तर संपूर्ण भारताचाच सर्वनाश ओढवेल..... आणि म्हणून त्यांच्या मते, खेड्यांची सेवा हीच खरीखुरी भारताची सेवा होती आणि ग्रामसेवा म्हणजेच स्वराज्य अशी त्यांची भूमिका होती.''

### २. खेड्यांचे प्रश्न व परावलंबित्व

१६ नोव्हेंबर १९३४ च्या ''हरिजन'' मध्ये गांधीजींनी लिहिले आहे की, ''खेड्यातील लोक निर्जीव जीवन जगत आहेत. त्यांचे जीवन म्हणजे हळूहळू उपासमारीकडे जाणारी प्रक्रिया आहे. त्याच्यावर कर्जाचा मोठा

भार आहे.'' ह्या ग्रामीण जनतेच्या गरिबीच्या प्रश्नाचा उल्लेख, गांधीजींनी अनेक ठिकाणी केलेला आहे. एक ठिकाणी शेतकऱ्यांविषयी त्यांनी म्हटले आहे की, ''देशात २१ कोटी शेतकरी आहेत. माझा स्वतःचा अनुभव आणि इतर अनेक अधिकारी लेखकांचा असा अनुभव आहे की, वर्षात निदान चार महिने तरी ते निरुद्योगी असतात. हा फार मोठा आर्थिक अपव्यय आहे. यामुळे ते दरिद्री आहेत यात काहीच आश्चर्य नाही.'' (यंग इंडिया २०-८-१९)

भारताच्या दारिद्र्याच्या प्रश्नाविषयी लिहितानाही, गांधीजींनी प्रकर्षाने या आर्थिक अपव्ययाचा उल्लेख केलेला आहे. ''आपला ८५ टक्क्यांपेक्षाही अधिक वेळ निरुपयोगी जातो. आणि त्यामुळे दादाभाई नौरोजींनी दाखवून दिलेल्या गळतीबरोबरच, या सक्तीच्या निरुद्योगीपणामुळे भारताचे दारिद्र्य सातत्याने वाढत गेले आहे.'' (यंग इंडिया ६-४-२१) गांधीजींनी आणखी एके ठिकाणी म्हटले आहे की, ''अनुभवाने माझी खात्री झाली आहे की, रोजच्या रोज भारत अधिकाधिक दरिद्री होत चालला आहे. त्याच्या हातापायातील रक्तप्रवाह आता जवळजवळ थांबला आहे. आणि आपण काळजी घेतली नाही तर देश संपूर्णतया कोसळेल.'' (यंग इंडिया १३-१०-२१)

ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यात भर घालण्याच्या बेकारीच्या प्रश्नाबरोबरच आणखीही एक निसर्गनिर्मित प्रश्नाचा उल्लेख गांधीजींनी केला आहे. ते लिहितात, ''पुन्हा पुन्हा उद्भवणारे दुष्काळ फार मोठ्या प्रमाणावर सक्तीच्या बेकारीत भर घालतात.'' (यंग इंडिया ३-११-२१) याचबरोबर ग्रामीण दारिद्र्याच्याएका वेगळ्या पैलूकडेही गांधीजी लक्ष वेधतात. ते म्हणतात ''वाढत्या प्रमाणात दारिद्र्याच्या गर्तेत जाणाऱ्या लाखो खेडुतांना काम कसे मिळवून द्यावे हाच खरा आजचा गंभीर प्रश्न आहे. आज अनेक तज्ज्ञांनी तर हे दाखवून दिलेच आहे पण जो कोणी ग्रामीण भागात जाण्याचे कष्ट घेईल त्यालाही हे जाणवेल, की माणसं आता आर्थिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्याही दुबळी होत चालली आहेत. त्यांची काम करण्याची, विचार करण्याची आणि जगण्याचीही इच्छा वेगाने नष्ट होत चालली आहे. हा तर जिवंतपणीचा मृत्यूच ते अनुभवताहेत.'' (हरिजन १०-१२-३८)

या ग्रामीण जनतेच्या बेकारीच्या आणि व्यापक अर्थाने असलेल्या सर्वांगीण दारिद्र्याच्या प्रश्नाची कारणमीमांसा करताना गांधीजी आधुनिक जगातील शहरी संस्कृतीकडे अंगुलीनिर्देश करतात. "शहराची होणारी वाढ हे मी एक प्रकारचे पापच मानतो. जगाच्या आणि मानवी जीवनाच्या दृष्टीने ही एक दुर्दैवाची बाब आहे. इंग्लंडच्या दृष्टीने आणि भारताच्या दृष्टीने तर निश्चितच ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ब्रिटिशांनी आपल्या शहरांच्याकरवीच भारताची पिळवणूक केली. आणि देशातील शहरे आता खेड्यांची पिळवणूक करीत आहेत. खेड्यांच्या (शोषून घेतलेल्या) रक्ताच्या सिमेंटवरच शहरी संस्कृतीची भव्य इमारत उभी आहे. आज शहरांच्या नसा टारून फुगवणारे रक्त, मला, पुन्हा एकदा, खेड्यांच्या धमन्यांतून वाहायला हवे आहे." (हरिजन २३-६-४६)

मुळात शहरांचा विकास झाला आहे तो खेड्यांच्या आधारावर. शहरांच्या विकासासाठी आजही फार मोठ्या प्रमाणावर साधनसामुग्री पुरविली जाते ती ग्रामीण भागाकडूनच. गेल्या शतकापेक्षाही जास्त काळ ही प्रक्रिया या देशात चालू आहे आणि दिवसेंदिवस ती तीव्र होत आहे. उत्पन्नाचा आणि साधनसामुग्रीचा ओघ सातत्याने खेड्यांकडून शहरांकडे वळत आहे. गांधीजी म्हणतात "अर्धा एक डझन आधुनिक शहरे ही निव्वळ बांडगुळे आहेत. आणि खेड्यांचा जीवन-रस शोषून घेण्याचे पापकर्म आजच्या क्षणाला ती करताहेत..... शहरांचे आक्रमक अपकृत्य हा खेड्यांच्या जीवनाला आणि स्वातंत्र्याला कायमचा धोका आहे." (हरिजन १७-३-२७)

गांधीजींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा एक धागा ग्रामीण पुनर्निर्माणाशी जोडलेला आहे. शहरांकडून ग्रामीण जीवनाची होणारी पिळवणूक ही गांधीजींच्या मते हिंसाच आहे. "माझ्या कल्पनेत असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत पिळवणुकीचे पूर्णतः उच्चाटन झालेले असेल. कारण पिळवणूक हा हिंसेचा अर्कच होय." (हरिजन ४-११-३९) असे गांधीजी म्हणतात. त्यांनी असेही म्हटले आहे की, "खेड्यांची पिळवणूक ही मूलतः संघटित स्वरूपाची हिंसा आहे. आपल्याला अहिंसेवर आधारित अशा स्वराज्याची मनिषा असेल तर आपल्याला, खेड्यांना त्यांचे योग्य स्थान प्राप्त करून द्यावे लागेल. आणि जोवर आपण देशी वा विदेशी शहरी कारखान्यातून तयार होणाऱ्या वस्तूंच्या ऐवजी ग्रामोद्योगांच्या वस्तू

वापरून त्या उद्योगांचे पुनरुज्जीवन करणार नाही, तोवर ही गोष्ट साध्य होणार नाही." (हरिजन २०-१-४०)

यामुळेच गांधीजी आपल्यासमोर एक पर्याय ठेवतात. "खरी गोष्ट अशी आहे की, भारताइतक्याच पुरातन असलेल्या खेड्यांचा भारत व परकीय सत्तेची निर्मिती असलेला शहरांचा भारत यात आपल्याला निवड करावी लागणार आहे." (हरिजन २०-१-४०)

खेड्यांचे वाढत्या शहरी संस्कृतीच्या आक्रमणापासून संरक्षण करायला हवे असे गांधीजींचे मत होते. "एके काळी शहरे ही खेड्यांवर अवलंबून होती, आता याउलट स्थिती आहे. यात परस्परावलंबित्व नाही." (हरिजन २८-१-३९)

गेले शतकभर तरी दारिद्र्य आणि बेकारी हेच ग्रामीण भागाचे आणि पर्यायाने भारताचे मूलभूत प्रश्न राहिलेले असून ते वाढत्या लोकसंख्येबरोबर व शहरांच्या वाढत्या प्रगतीबरोबर सातत्याने तीव्र होत गेले आहेत. पन्नास वर्षांपूर्वी गांधीजी या परस्परसंबंधित प्रश्नांवरचे उत्तर खेड्यांच्याच स्तरावर शोधू पाहत होते आणि स्वातंत्र्योत्तर काळात आपण त्यांची उत्तरे राष्ट्रीय समष्टीस्तरावर शोधू पाहत आहोत.

खेड्यांच्या विकासाचा प्रश्न, "ग्रामीण संस्कृती मुळापासून उखडून काढून तिच्या जागी शहरी संस्कृतीची प्रतिष्ठापना करून सुटण्यासारखा नाही." यावर गांधीजींनी कायम भर दिलेला आहे. त्यांचा आधुनिक यंत्रांना असलेला विरोध, आधुनिक पाश्चात्य पद्धतीच्या औषधांना असलेला विरोध, किंवा पाश्चात्य पद्धतीने आणि इंग्रजी माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाला केलेला विरोध आणि शहरातील विशिष्ट पद्धतीच्या (अगदी संडासासारख्याही) सुधारणांना खेड्यात पोचविण्यास असलेला विरोध, या खूपशा टीकाविषय झालेल्या विचारांना ग्रामीण विकासाच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान आहे. गांधीजींचे हे विचार, आजच्या घडीला निर्माण झालेले खेड्यांचे शहरावरील तीव्र परावलंबित्व आणि या संबंधापोटी खेड्यांची शहराकडून होणारी विविधांगी पिळवणूक तसेच शहरे व खेडी यांमधील वाढती विषमता या संदर्भात तर अधिकच उपयुक्त ठरणारे आहेत.

गांधीजींचे असे सांगणे आहे की, भारताची संस्कृती ही ग्रामीण संस्कृती

आहे असे गृहीत धरूनच सुधारणेची पावले टाकायला हवीत. एकूण भारताच्या विकासाचा पवित्रा ठरवताना, 'खेड्यांच्या विकासाकरवी देशाचा विकास' अशी दिशा पकडायला हवी. आणि आपला अनुभव आहे की, 'देशाच्या विकासाकरवी खेड्यांचा विकास' ही नंतरच्या काळात राष्ट्रीय नियोजनाने स्वीकारलेली दिशा. एकूण राष्ट्रीय विकास, खेड्यांच्या पातळीवर झिरपू देण्याच्या बाबतीत यश देऊ शकलेला नाही.

गांधीजींनी आपल्याला संदेश देऊन ठेवला आहे की, "जगात दोन विचारप्रणाली महत्त्वाच्या आहेत. एक, जगाची विभागणी शहरांमध्ये करण्याची तर दुसरी खेड्यांमध्ये करण्याची. शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती. या दोन अगदी भिन्न गोष्टी आहेत. एक यंत्रे आणि औद्योगीकरणावर आधारित आहे तर दुसरी हस्तोद्योगावर."

गांधीजी म्हणतात, "अखेरीस औद्योगीकरण आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादन या तुलनेत अगदी अलीकडच्या गोष्टी आहेत. त्यांनी आपल्या आनंदात किती भर घातली आहे कुणास ठाऊक, पण आपल्याला हे माहीत आहे की, त्यांनी जागतिक युद्धे मात्र घडवून आणली. दुसरे महायुद्ध अजून संपुष्टात आले नाही पण तोवरच तिसऱ्या महायुद्धाची वार्ता ऐकू येत आहे. आपला देश आजच्या इतका वाईट अवस्थेत आणि दु:खी कधीही नव्हता. शहरातील लोकांना लठ्ठ नफे आणि चांगले वेतन मिळत असेल पण ते सर्व खेड्यांचे रक्तशोषण करून त्यांना शक्य होत आहे. आपल्याला लाखो कोट्यावधी रुपये जमवायचे नाहीत. आम्हाला कामासाठी नेहमीच पैशांवर अवलंबून राहायचे नाही. आमची आमच्यावर श्रद्धा असली पाहिजे व आपण स्वत:शी प्रामाणिक असले पाहिजे. यासाठी खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी बनली पाहिजेत. लक्षात ठेवा, माझी स्वयंपूर्णतेची कल्पना संकुचित नाही. या कल्पनेत स्वार्थ आणि उद्धटपणा यांना अजिबात थारा नाही." (प्रेस रिपोर्ट, ६-१२-४४)

### ३. 'स्वयंपूर्ण खेड्यां'ची संकल्पना

खेड्यांचे शहरांवरील अवलंबित्व आणि शहरांकडून होणारी खेड्यांची पिळवणूक या दोन्ही, परस्परसंबंधित गोष्टी टाळून नवी 'अहिंसक' समाजरचना घडविण्यासाठी गांधीजी आपली 'स्वयंपूर्ण खेड्यां'ची

संकल्पना विस्ताराने मांडतात. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे गांधीजींचे उद्गार आहेत की, "स्वतंत्र भारताच्या पुनर्उभारणीच्या योजनेत, आजच्यासारखी खेडी शहरांवर कदापीही अवलंबून राहता कामा नयेत. याउलट शहरानीच खेड्यांसाठी, आणि खेड्यांच्या हितासाठीच केवळ जगले पाहिजे." (हरिजन ४८-१-४७) गांधीजींच्या स्वयंपूर्ण खेड्यांच्या कल्पनेला, एकीकडे जसा खेड्याच्या परावलंबित्वाचा पाया आहे तसाच, मनुष्याच्या मूलतः असलेल्या सामाजिकतेचाही आहे. "द लास्ट फेज"मध्ये म. गांधींच्या पुढील उद्गारांचा उल्लेख आहे. "मनुष्य हा विभक्त राहण्यासाठी जन्माला आलेला नाही तर तो मूलतः सामाजिक प्राणी आहे. एकाच वेळी तो स्वावलंबी आणि परावलंबीही आहे. कोणी कुणाच्या पाठीवर स्वार होऊ शकणार नाही आणि होऊही नये. आपण जर अशा जीवनाची कल्पना केली तर आपण याच निष्कर्षाला येऊ की, समाजघटक एक खेडे किंवा लोकसंख्येचा एक छोटा गट हाच मानावा लागेल. आदर्श स्थिती अशी असेल की (मूलभूत गरजांच्या बाबतीत हा घटक स्वयंपूर्ण असेल आणि इतरांशी परस्पर सहकार्य आणि परस्परावलंबित्व यांनी बद्ध असेल.") अशा या स्वयंपूर्ण खेड्यात गावकरी करू शकतील आणि त्यांना परवडू शकेल अशा प्रकारच्या यंत्रांना गांधीजींचा विरोध नव्हता. त्यांचा विरोध होता तो ग्रामोद्योग नष्ट करणाऱ्या, शहरात केंद्रित झालेल्या आधुनिक उपादन पद्धतीला आणि त्यातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या यंत्रसामुग्रीला. अशा खेड्यातील उत्पादन उपभोगाचे स्वरूप गांधींनी 'हरिजन'मधील एका लेखात स्पष्ट केले आहे. "जर आता अधिक पिळवणूक होणार नसेल तरच खेड्यांचे पुनरुज्जीवन शक्य आहे. मोठ्या प्रमाणावरील औद्योगीकरणात स्पर्धा आणि विक्रीचे प्रश्न अनुस्यूत असल्यामुळे त्यातून खेडुतांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शोषण होतच राहणार त्यामुळेच आपल्याला स्वतःच्या गरजेचे उत्पादन करणाऱ्या स्वयंपूर्ण खेड्यावरच लक्ष केंद्रित करायला हवे." (हरिजन २६-८-३६)

स्वतःच्या गरजेचे उत्पादन करणारी आणि दुसऱ्यांचे शोषण टाळणारी उत्पादनपद्धती म्हणून. अर्थातच, गांधीजींनी ग्रामोद्योगांची निवड केली. त्यांनी म्हटले आहे, "झोपडीत राहणाऱ्या शेतकऱ्याला जर त्याचा जुना ग्रामोद्योग प्राप्त करून दिला आणि आपल्या मूलभूत गरजांसाठी जो आजच्यासारखा शहरांवर नव्हे तर स्वतःच्या खेड्यावरच अवलंबून राहिला

तरच त्याची सुधारणा होणे शक्य आहे. हे साधे तत्व आत्मसात केले नाही तर ग्रामीण पुनर्निर्माणासाठी कितीही वेळ दिला तरी तो फुकटच जाईल", (हरिजन २४-३-३९) थोडक्यात असे की, "खेडी हीच स्वतःची ग्राहक असतील. ती स्वतःच्या उत्पादनाचाच उपभोग घेतील, कारण नव्वद टक्के लोकसंख्या खेडुतांचीच आहे. शिवाय ही खेडी जे शक्य ते उत्पादन शहरांनाही पुरवतील."

गांधीजींच्या या 'स्वयंपूर्ण खेड्या'च्या कल्पनेतील अर्थशास्त्रीय तत्त्वाचा फार चांगला वेध श्री. बिपीन बिहारी यांनी आपल्या एका लेखात घेतला आहे. त्यांनी विस्ताराने मांडलेला विश्लेषक मुद्दा असा आहे की, "आदर्श अशा स्वयंपूर्ण आर्थिक घटकाची कल्पना ही गांधीवादी व अगांधीवादी अर्थशास्त्रज्ञांमधील फार मोठी विवाद्य गोष्ट ठरली आहे. असेही कित्येकदा मानले जाते की स्वयंपूर्णता ही केवळ प्राथमिक समाजातच शक्य होती. परंतु खोलवर विश्लेषण केले असता असे आढळून येईल की, यामधून महात्मा गांधी हे निसर्गप्रणीत उपभोग स्वरूप आणि प्रदेशाच्या उत्पादन-शक्यता यांमधील समतोल सुचवीत होते. खेड्यांचे निसर्गप्रणीत उपभोग स्वरूप हे, प्रादेशिक भूगर्भशास्त्रीय परिस्थिती, लोकांचे शारीरिक व नैसर्गिक गुण, समाजात अस्तित्वात असलेल्या प्रथा आणि पारंपरिक निर्बंध, प्रदेशाचे व्यावहारिक आणि औद्योगिक स्वरूप आणि समाजाची शैक्षणिक व सांस्कृतिक पातळी या सर्व गोष्टींवर अवलंबून असते. या सर्वांवरूनच समाजाच्या राहणीमानाचे, आणि गरजांचे स्वरूप निश्चित होते. अशाप्रकारच्या समुदायाच्या गरजा त्यांच्या उपभोगाचे नैसर्गिक स्वरूप ठरवतात.

अशाप्रकारे प्रदेशाच्या उत्पादनशक्यता या खनिजे, भौगोलिक व हवामानाची परिस्थिती तसेच तेथे आढळणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या प्राण्यांचे अस्तित्व यावरून ठरतात.

समाज, विकासाच्या कोणत्या अवस्थेत आहे याचाही परिणाम उत्पादन कार्यक्रम ठरण्यावर होत असतो. महात्मा गांधी जे काही सांगत होते तेच प्रोफेसर इटो आज सांगत आहेत. एकाद्या प्रदेशाच्या उत्पादन शक्यता आणि नैसर्गिक उपभोग स्वरूप यांचे आवश्यक वस्तूंच्या उत्पादनासाठी उचित तंत्रज्ञान वापरून, एकीकरण होत असेल तर खेडुतांमध्ये पुरेशा

प्रमाणावर जागृत करता येईल. हे झाले तर ग्रामीण पुनर्निर्माणाचा बराचसा प्रश्न सुटू शकेल.

ही कल्पना श्री. जयप्रकाश नारायण यांच्या कल्पनेशी मिळती जुळती आहे. त्यांनी म्हटले आहे की, ग्रामीण औद्योगीकरण हे दोन गोष्टीवर आधारित असले पाहिजे. एक स्थानिक, मानवी व भौतिक साधने आणि दोन गरजा. ''स्थानिक'' याचा अर्थ केवळ 'एक खेडे' असा नाही. कदाचित 'एक खेडे' असेल वा खेड्यांचा एखादा गट असेल, किंवा एखादा ब्लॉक अथवा जिल्हाही असू शकेल. हे उद्योगाचे स्वरूप आणि वापराचे तंत्र यावरून ठरेल. ग्रामीण उद्योगाचा कच्चा माल हा मुख्यत: भोवतालच्या प्रदेशातून आला पाहिजे. अर्थात काही भाग उदा. शेतीच्या अथवा कारागीरांच्या अवजारांसाठी लागणारे लोखंड, पोलाद वगैरे आणि बांधकामासाठी लागणारे खिळे, नट्स्, हिंजेस् इ. शहरातून आणले तरी हरकत नाही. थोडक्यात गांधीजींचा ग्रामीण पुनर्रचना दृष्टिकोण हा प्रोफेसर मेरीमोन इटो, इ. ए. शुमाकर आणि श्री. जयप्रकाश नारायण अशा आधुनिक विचारवंतांच्या विचारसरणीशी मिळताजुळता असा आहे. मुख्य प्रश्न आहे तो प्रत्यक्ष योजना करून राबवण्याचा.

महात्मा गांधींच्या विचारावर आधारित असा एखादा 'स्वयंपूर्ण खेड्यां'चा प्रयोग राबविण्यासाठी जी योजना करावयाची त्याचे मूलभूत सूत्र श्री. बिपिन बिहारी यांनी स्पष्ट केलेले, आणि गांधीजींच्या कल्पनेतील उपभोग आणि उत्पादन किंवा मागणी आणि पुरवठा यांचा विशिष्ट प्रदेशांतर्गत मेळ घालणारे असे असले पाहिजे. शिवाय अशा ठिकाणचे उत्पादन मूलत: श्रमप्रधान (अधिकांना रोजगार पुरविणारे) आणि उचित तंत्रांचा वापर करून ग्रामोद्योगांनी बनविलेले असे असावे लागेल. तसेच, प्रामुख्याने, माणसांच्या प्राथमिक गरजांची पूर्णत: पूर्ती करणारे असे ते असेल. दुसऱ्या बाजूला, माणसांनी आपल्या गरजाही, गांधीजींनी वेळोवेळी प्रतिपादन केल्याप्रमाणे किमान आवश्यक गोष्टींशी मर्यादित केल्या तर या बाबतीत स्थानिक पातळीवरील स्वयंपूर्णता अशक्य नाही.

अर्थात तरीहि एक प्रश्न राहील. केवळ आवश्यक गरजांच्या, उपभोग उत्पादनाचा समतोल साध्य करण्यासाठी 'एक खेडे' हा घटक सुयुक्तिक ठरेल काय ? 'एका खेड्यांची' आर्थिक क्षमता, असा समतोल घडवून

आणणारी असेल काय? मला वाटते गांधीजींच्या 'स्वयंपूर्ण खेडचा'च्या संकल्पनेचा जर विस्तार करायला वाव आहे.

पाणी, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या आधुनिक मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या आणि त्यांचे उत्पादन आणि पुरवठा स्थानिक पातळीवर आर्थिकदृष्ट्या कार्यक्षम व्हावयाचा असेल तर काही एक 'किमान मागणीची' खात्री आणि सातत्य असावे लागेल. यासाठी विशिष्ट प्रमाणातील लोकसंख्या अनिवार्य ठरेल. आणि मग 'एका खेडचा'चा आग्रह न धरता, आपल्याला, लोकसंख्येची ही किमान अट भागविणारी, लोकसंख्या केन्द्रित झालेला प्रदेश, 'एक घटक' म्हणून स्वीकारावा लागेल. हा घटक म्हणजे कदाचित एकच मोठे गाव असेल किंवा जवळपासच्या गावांचा एक गट असेल.

याचबरोबर या सर्व गरजा पुरविणारी उत्पादन शक्यता विचारात घेताना देखील, कदाचित, आपल्याला 'एक खेड्या' कडून खेड्यांच्या एका गटाकडे वळावे लागेल. आवश्यक त्या कच्च्या मालाची आणि मानवी कौशल्याची पूर्ती करण्याच्या दृष्टीने 'एक खेड्या' ऐवजी 'खेड्यांचा एक गट' आर्थिकदृष्ट्या सक्षम म्हणून स्वीकारणे अधिक संयुक्तिक ठरेल.

अत्यंत स्थूल मानाने असे म्हणता येईल की, सुमारे पाच हजार लोकसंख्येचा, हजार कुटुंबांचा आणि पाच चौरस मैलांचा प्रदेश हा महात्मा गांधींच्या कल्पनेतील 'स्वयंपूर्ण' ते साठी अधिक संयुक्तिक ठरेल.

गांधीजींनी म्हटले होते, "माझ्या कल्पनेतील खेडे हे अत्यंत बळकट व्यवस्था असलेले असेल. माझ्या कल्पनेतील खेड्यात हजार माणसे असतील. हे खेडे जर स्वयंपूर्णतेच्या तत्त्वावर संघटित केलेले असेल तर ते उत्तम तऱ्हेने कार्यरत राहील." (हरिजन ४-८-४६) आपण फक्त प्रत्यक्ष परिस्थितीनुसार या 'स्वयंपूर्ण खेड्या'ची कल्पना विस्तारीत आहोत.

### ४. ऊर्ध्वगामी नियोजन

गांधीजींची स्वयंपूर्ण खेड्याची संकल्पना, खेड्यातील मनुष्यास कामाची नि उत्पन्नाची शाश्वती देऊन दारिद्य निवारण करणारी आणि परावलंबित्व टाळून शहरांकडून होणाऱ्या पिळवणुकीतून खेड्यांची सोडवणूक करणारी म्हणूनच केवळ महत्त्वाची नाही. ही संकल्पना आर्थिक आणि राजकीय

सत्तेचे केंद्रीकरण टाळणारी, एक प्रकारची अ-केंद्रित अशी व्यवस्था निर्माण करणारी म्हणूनही महत्त्वाची आहे. गांधीजींनी 'यंग इंडियात' लिहिले आहे की, ''मला संपत्तीचे केंद्रीकरण थोड्या लोकांच्या हातात व्हायला नको आहे, तर ते सर्वांच्या हातात व्हायला हवे आहे. आज यंत्रे काही थोड्या लोकांना इतर लाखोंच्या पाठीवर स्वार व्हायला मदत करतात.'' (१३-११-२४) याचा अर्थ असा की, गांधींजींचा आधुनिक तंत्रज्ञानाला असलेला विरोध, जसा त्यामुळे खेड्यांचे दारिद्र्य विस्तारते यामुळे होता, तसाच तो, त्यातून आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण काही थोड्या लोकांच्या हाती होते यामुळेही होता. ''यंत्राचा संघटितरीत्या वापर थोड्या लोकांच्या हाती, मत्तेच्या आणि सत्तेच्या केंद्रीकरणाच्या आणि अनेकांच्या पिळवणुकीच्या हेतूने करणे ही गोष्ट मी अत्यंत चुकीची मानतो. आणि आजच्या कालातील यंत्रांचे बहुतेक संघटन हे अशा प्रकारचे आहे.'' (यंग इंडिया १७-९-२५) असे गांधीजींनी फार पूर्वीच आपले मत मांडून ठेवले आहे.

ज्याप्रमाणे संपत्तीचे केंद्रीकरण खाजगी थोड्या हातात होणे गांधीजींना अमान्य होते, त्याचप्रमाणे ते शासनाच्या हाती असण्यालाही त्यांचा विरोध होता. कारण यातूनच राजकीय सत्तेचे केंद्रीकरण निर्माण होऊन, त्याने तर एकूणच मानवाच्या स्वातंत्र्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असते. गांधीजींनी म्हटले आहे, ''शासनाची सत्ता बळकट होणे याचे तर मला सर्वात जास्त भय वाटते. कारण वरपांगी लोकांची पिळवणूक कमी करून त्यांचे भले करत असतानाच, सर्व प्रगतीच्या मुळाशी असलेले मानवाचे व्यक्तिमत्त्व नाहीसे करून, ती एकूण मानवी जीवनाला फारच मोठा धोका निर्माण करीत असते.''

मोठ्या प्रमाणावरील उत्पादनपद्धती आणि अतिविकसित तंत्रज्ञानाचा वापर यातून निर्माण होणाऱ्या आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणाचा धोका गांधीजींनी अनेक वेळा दाखवून दिला आहे. कारण गांधीजींच्या मते, ''थोड्या लोकांच्या हाती होणारे आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण अनिष्ट आहे. कारण त्यातून अल्प गटाकडून बहुसंख्य लोकांची पिळवणूक होत असते. आणि कोणत्याही प्रकारची पिळवणूक ही हिंसाच आहे. त्यामुळे थोड्या लोकांच्या हातात काय किंवा सरकारच्या हाती काय, जी काय तंत्रज्ञानाची, पिळवणुकीवर आधारित, व्यवस्था असेल ती अखेरीस, हिंसेलाच जन्म

देत असते आणि हिंसा, मग ती कोणत्याही प्रकारची असो, ती सत्याचा प्रतिरोधच असते.'' गांधीजींचा त्यामुळे अशा तंत्रज्ञानाला विरोध होता.

यासाठी मुळातच गांधीजी, अशी अर्थव्यवस्था निर्मू पाहत होते की, ज्यात मुळातच पिळवणुकीकरवी निर्माण होणारी हिंसा आणि अशी हिंसात्मक पिळवणूक निर्माण करणारे आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण अस्तित्वात येणार नाही. केन्द्रीकरणाकडून विकेन्द्रीकरणाकडे वळणारी व्यवस्था त्यांना अभिप्रेत नव्हती, तर मूलतः अकेन्द्रित व्यवस्था ते शोधू पाहत होते. आणि ही व्यवस्था फक्त स्वयंपूर्ण खेड्यांच्या स्वतंत्र शासकीय घटकातून निर्माण होऊ शकते असा त्यांचा विश्वास होता. त्यांनी म्हटले आहे, ''तुम्हाला कारखानदारी संस्कृतीवर अहिंसेची इमारत उभी करता येणार नाही, ती फक्त स्वयंपूर्ण खेड्यांवरच उभी राहू शकेल.'' (हरिजन ४-११-३७)

''जर गांधीजींना अभिप्रेत असलेले तंत्रज्ञानाचे विकेन्द्रीकरण झाले आणि प्रत्येक खेडे स्वतंत्र, पण अशा तंत्रज्ञानाचे मालक बनले तर आर्थिक सत्तेचे विकेन्द्रीकरण होऊन ती सर्वच खेड्यामध्ये विखुरली जाईल. या गांधीप्रणीत व्यवस्थेत खेडे हा सामाजिक जीवनाचा केन्द्रबिंदू असेल. मग या आर्थिक सत्तेच्या विकेन्द्रिकरणाची परिणती सहजच राजकीय सत्तेच्या विकेन्द्रीकरणात होईल.'' अशा व्यवस्थेत, खेड्यांची अर्थव्यवस्था जशी स्वयंपूर्ण असेल तशी राज्यव्यवस्थाही स्वयंपूर्ण अशी असेल. गांधीजींनी या एकत्रित व्यवस्थेसच 'खेड्यांचे स्वराज्य' असे म्हटलेले आहे. ''खेड्यांचे स्वराज्य' ही माझी कल्पना अशी आहे की, ते एक पूर्ण गणराज्य असेल. ते आपल्या मूलभूत अशा गरजांच्या बाबतीत स्वावलंबी असेल तर इतर परस्परावलंबी गरजांच्या बाबतीत शेजारी गावांवर अवलंबून असेल.'' (हरिजन २६-७-४२).

खेड्यात वास करणाऱ्या सुमारे ८० टक्के लोकसंख्येच्या मूलभूत गरजांच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य झाली पाहिजे; म्हणजे विकेन्द्रित अर्थव्यवस्थेचा, शोषण नाहीसे करण्याचा मूलभूत हेतू आपोआपच साध्य होतो. तसेच ही 'स्वयंपूर्ण खेडी' इतर गरजांच्या पूर्तीच्या बाबतीत इतर गांवे किंवा आजूबाजूच्या प्रदेशावर अवलंबून असतील. म्हणजे लोकांच्या अधिक गरजांच्या बाबतीत खेड्यांचा एक मोठा गट किंवा प्रदेश स्वयंपूर्ण

होऊन, प्रादेशिक पातळीवरील स्वयंपूर्णता साध्य करता येईल. त्याहूनही वरच्या गरजांच्या बाबतीत सर्वच लोक राष्ट्रावर अवलंबून असतील पण त्यातून शोषणाची शक्यता बरीच कमी झालेली असेल. अशा प्रकारे राष्ट्रीय स्वयंपूर्णता गाठली जाईल. आर्थिक पातळीवरील या विकेन्द्रित आणि उत्पादनाच्या ऊर्ध्वगामी नियोजन पद्धतीने शोषणरहित आणि म्हणून अहिंसक समाजनिर्मितीचे गांधीजींचे स्वप्न साध्य होणार आहे. राजकीय सत्तेच्या बाबतीतही आपसूकच अशीच विकेन्द्रित ऊर्ध्वगामी नियोजन पद्धती या व्यवस्थेत निर्माण होईल. या बाबतीत गांधीजींनी लिहिले आहे की, "स्वातंत्र्याची सुरुवातच सर्वात खालच्या स्तरापासून झाली पाहिजे. म्हणजे प्रत्येक खेडे हे पूर्ण सत्ता असलेले गणराज्य किंवा पंचायत असेल. याचाच अर्थ असा की, प्रत्येक खेडे स्वयंचलित असेल. आपले सर्व व्यवहार, अगदी सबंध जगापासून संरक्षण करण्यापर्यंतचे व्यवहार ते सांभाळतील. बाहेरच्या कोणत्याही जोरदार हल्ल्यास तोंड देण्याची आणि त्यासाठी आत्मत्याग करण्याचे शिक्षण आणि तयारी तेथे असेल. अशा प्रकारे अखेरीस प्रत्येक मनुष्य हाच एक प्रमुख घटक असेल. या व्यवस्थेत शेजाऱ्याकडून किंवा जगाकडून मिळणारी मदत किंवा अवलंबित्व पूर्णतः नाहीसे करण्याची गरज नाही. परंतु ती मुक्तपणे आणि स्वेच्छेने स्वीकारलेली परस्परसहाय्यक असेल." (हरिजन २८-७-४६).

ही स्वयंपूर्ण खेड्यांवर आधारित राजकीय आणि आर्थिक व्यवस्था गांधीजींच्या विचारात, खालून वर अशी बांधलेली असेल. मग त्यात सर्वात खालच्या खेडेगावांच्या पातळीवर सर्वात जास्त अधिकार असतील व पुढे ते कमी कमी होत जातील. गांधीजींनी लिहिले आहे, "असंख्य खेड्यांनी व्यापलेल्या या संरचनेत कधीही संकोच न होणारी, सतत विस्तार पावणारी अशी वर्तुळे असतील. असे जीवन पिरॅमीडसारखे, म्हणजे ज्यात शिखर हे पायावर आधारलेले आहे, असे नसेल, तर ते वर्तुळावर सागरी लाटांसारखे असेल आणि त्याचा केन्द्रबिंदू असेल मनुष्य. असा मनुष्य की जो आपल्या खेड्यासाठी सततच प्राणार्पण करायला तयार असेल. खेडे असेच खेड्यांच्या गटासाठी, प्रदेशासाठी आत्मनाशास तयार असेल. अशा पद्धतीने एक संपूर्ण असे समाज जीवन उभे राहील की ज्यामधील प्रत्येक व्यक्ती आपल्या अहंभावाबद्दल दुराग्रही नसेल तर विनयी असेल आणि आपण या विशाल वर्तुळाकार सागरी लाटेचेच एक छोटेसे अंग

आहोत हे समजून या संपन्नेतील आपला वाटा स्वीकारील, अशा प्रकारे सर्वात बाहेरचे वर्तुळ अंतर्गत वर्तुळांना नाहीसे करण्याची शक्ती संपादन करणार नाही तर उलट त्यांनाच आवश्यक ती शक्ती देऊन त्यांच्याकडून आपले स्वत:चे सामर्थ्य प्राप्त करील.' (हरिजन २८-७-४६).

दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर भारतात प्रयत्न झाला तो केन्द्रीभूत अधोगामी नियोजनांचा. प्रत्यक्ष अत्यंत खालच्या खेडेगावांच्या पातळीवर विकास योजना राबवायच्या त्या पातळीवर कोणत्याही प्रकारची सत्ता, मत्ता आणि स्वातंत्र्य पोचलेले नाही. पाश्चात्य अर्थशास्त्राच्या प्रभावाने तयार झालेल्या पिढ्यांनी या योजना तयार केलेल्या असल्यामुळे, त्यात महात्मा गांधींनी सुचविलेल्या दिशेचा किंचित्सा स्पर्शही या नियोजन प्रयत्नास झाला नाही. विनोबाजींनी या सरकारी योजनांचे स्वरूप सांगताना म्हटले आहे, 'उत्पादन वाढले तर खालच्या थरापर्यंतही त्याचा काही ना काही अंश पोहोचेल अशा कल्पनेवर योजनांचा आधार आहे. याला मी 'थिअरी ऑफ परकोलेशन', 'वरून टाकलेले पाणी हळू हळू पाझरत खालच्या थरापर्यंत पोहोचेल- असा सिद्धांत म्हणतो. आता या 'परकोलेशन' मध्ये जर कुठे मातीच्या खाली खडक लागला तर पाणी खाली जाऊ शकेल काय? आणि सिद्धांत निरर्थक सिद्ध झालेला आहे. इतक्या योजना झाल्या, उत्पादन वाढले, जीवनस्तरही काही वर आला पण खालच्या स्तराच्या लोकांना या योजनांचा खास लाभ काही मिळाला नाही. म्हणूनच पंडित नेहरूही शेवटी शेवटी असे म्हणू लागले होते की, "ज्या पद्धतीने गांधी विचार करीत होते त्या पद्धतीने विचार करावा लागेल. देशाचा सरासरी जीवनस्तर वाढला एवढ्याने काम भागत नाही. मुद्दाम दरिद्री लोकांचे ध्यान ठेवून योजना घडवावी लागेल तेव्हाच त्यांच्यापर्यंत मदत पोहोचते." परंतु, अशा तऱ्हेचा कोणताही प्रयत्न शासकीय नियोजनाधिकाऱ्यांना कधी अभिप्रेतच नव्हता आणि त्यामुळे तो कधी घडूनही आला नाही.

"अलीकडे राष्ट्रीय नियोजनाचे अपयश जाणून त्यात बदल करण्यासाठी 'तलस्तरीय योजना पुढे आली. तलस्तरीय नियोजनाचा प्रकट आविष्कार 'जिल्हा योजने'च्या द्वारे झाला. परंतु जिल्हा नियोजन हे आजही राष्ट्रीय नियोजनाचेच छोटे रूप आहे. क्षेत्रीय वाटणी असलेले वित्तीय नियोजन हेच त्याचे स्वरूप राहिलेले आहे." एकदा केन्द्राकडे बहुतेक सर्व अधिकार सुपूर्त केल्यानंतर त्यातून खाली थेट खेड्यांच्या पातळीवर अधिकारांचे

विकेन्द्रीकरण होणे आता अशक्य ठरले आहे. आणि गांधीजींच्या कल्पनेतील 'स्वराज्य' येणे त्यामुळे फारच दूर गेलेले आहे.

### ५. स्वेच्छा प्रयत्न

सत्तेचे नि संपत्तीचे विकेन्द्रीकरण या गोष्टी परस्पर पोषक असतात. सरकारकडे अधिकारांचे केन्द्रीकरण असणे हा गांधीप्रणीत खेड्यांच्या गणराज्याचा व्यत्यास आहे आणि म्हणूनच गांधीजींनी आपल्या नवीन समाजरचनानिर्मितीच्या योजनेत कुठेही केन्द्र सरकारकडे हक्क किंवा जबाबदाऱ्या सूपूर्त केलेल्या नाहीत. या उलट आपल्या ग्रामीण सुधारणांविषयीच्या सर्वच लेखनात त्यांनी स्वेच्छा प्रयत्नावर भर दिलेला आहे. विशेषत: देशातील दारिद्य निवारण, खेड्यांची सर्वांगीण सुधारणा आणि ग्रामीण समाजाभिमुख मनोरचना तयार करण्याच्या बाबतीत त्यांनी स्वयंसेवी प्रयत्नांवर भर दिलेला आहे. लोकांना खेड्याकडे वळण्याचा सल्ला देऊन त्यांनी ग्रामीण पुनर्निर्माणाच्या कार्यात स्वत:ला झोकून देणारी एक मोठी पिढीही निर्माण केली.

भारतीय अर्थव्यवस्थेत, कित्येक वर्षे ग्रामीण भागाकडे आपले दुर्लक्ष झालेले आहे आणि आता मोठ्या प्रमाणावर शहरातील सुशिक्षितांनी खेड्याकडे वळले पाहिजे यावर भर देऊन गांधीजी लिहितात की, ''ज्यांना शिक्षणाचा लाभ झाला आहे अशांकडून फार काळ दुर्लक्ष झाल्यामुळे खेड्यांना फार दु:ख भोगावे लागले आहे. त्यांनी शहरी जीवनाची निवड केली आहे, खेड्यांची चळवळ म्हणजे खेड्यांशी एक निरोगी संबंध प्रस्थापित करणे होय आणि तो सुद्धा, जे सेवेच्या भावनेने भारलेले आहेत व जे प्रत्यक्ष खेड्यात वास्तव्य करून, ग्रामसेवेतच आत्मोन्नती मानतील, अशांच्या करवी.. जे लोक सेवाभावनेने खेड्यात जाऊन राहिलेले आहेत त्यांनी कोणत्याही प्रकारच्या अडीअडचणींची तमा बाळगलेली नाही. त्यांना तिकडे जाण्यापूर्वीच माहिती होते की, त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार होते, अगदी गावकऱ्यांच्या टीकेलाही. ज्यांची स्वत:वर आणि स्वत:च्या कार्यावर श्रद्धा आहे असाच मनुष्य खेडुतांची सेवा करू शकेल किंवा त्यांच्या जीवनावर परिणाम करू शकेल. लोकांच्यात व्यतीत केलेले प्रामाणिक आयुष्य हाच एक आदर्श आहे आणि त्याचा सभोवतालच्या भागावर निश्चित परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.'

(हरिजन २०-२-३७).

देशातील तरुण विशेषत: सुशिक्षित, सुरक्षित आणि तुलनेने संपन्न असणाऱ्या तरुण पिढीकडे गांधीजी आशेने पाहतात. खेड्यांशी आणि खेड्यांच्या प्रश्नांशी समरस होऊन आपल्या बुद्धिमत्तेचा वापर ग्रामीण विकासासाठी करणारी एक पिढी गांधीजींनी आपल्या आचार व विचार प्रभावाने निर्माण केली; आणि केवळ समाजसेवा हेच व्रत घेऊन व्यक्तिगत पातळीवर किंवा स्वेच्छाकार्य संस्थांची निर्मिती करून, अनेकांनी खेड्यांच्या आणि मागासलेल्या समाजाच्या सुधारणेचा ध्यास घेतला होता. सात नोव्हेंबर १९२९ च्या 'यंग इंडिया'मध्ये गांधीजींनी लिहिले आहे, "एक मात्र नक्की की देशातील तरुण वर्ग ग्रामीण जीवनाशी समरस झाला तरच काही घडू शकेल. त्यांनी तसे ठरविले तर त्यांना आपल्या जीवनात परावर्तन करावे लागेल, आपल्या सुट्टीचा प्रत्येक दिवस त्यांना, शाळा कॉलेजच्या भोवतालच्या खेड्यात घालवावा लागेल. ज्यांचे शिक्षण पूर्ण झालेले असेल किंवा जे आज शिक्षण घेत नसतील त्यांनी खेड्यात जाऊन स्थायिक होण्याचा विचार केला पाहिजे. त्यांना एकदा कळू देत, म्हणजे मग, त्यांच्या लक्षात येईल की, इथे सेवा कार्याला, संशोधनाला आणि खऱ्या ज्ञानाला केवढा अमर्याद वाव आहे. प्राध्यापकांनीही मुला-मुलींवर त्यांच्या सुट्ट्यातून पुस्तकी अभ्यासाचा भार न टाकता त्यांना खेड्यांच्या शैक्षणिक सहलींना प्रवृत्त केले पाहिजे. त्यांनी आपल्या सुट्ट्यांचा उपयोग अशा आनंदासाठी केला पाहिजे, पुस्तकी पाठांतरासाठी नाही".

सुमारे साठ वर्षांपूर्वी गांधीजींनी केलेला हा उपदेश याच शब्दात विद्यार्थी व शिक्षकांना करण्याची आज अधिकच गरज निर्माण झाली आहे. शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती यामधील आर्थिक, शैक्षणिक आणि मानसिक अंतर जेवढे वाढेल तेवढी या दिशेने उपाययोजना करण्याची गरजही वाढणार आहे. वास्तविक समाजातील गरिबांचा कळवळा असणे, त्यांना दानरूपाने सातत्याने मदत करणे आणि अशा दानात आनंद व जीवनात साफल्य मानणे हा वारसा हिंदु संस्कृतीने इथल्या समाजाला बहाल केलेला आहे. परंतु, 'मिशनरी' पद्धतीने जीवनदान करून दुर्बलांच्या सेवेला वाहून घेणे या पाश्चात्य पद्धतीची एक नवीन परंपरा निर्माण करण्याचे कार्य गांधीजींनी मोठ्या प्रमाणावर केले.

हा वारसा घेऊन अनेक लोक व्यक्तिश: किंवा स्वेच्छाकार्य संस्था स्थापन करून ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यात मग्न आहेत. परंतु आज स्वातंत्र्याच्या काळातही त्यांना अनेक अडचणीतून जावे लागत आहे. अर्थात खरी अडचण आहे ती, याहूनही कितीतरी अधिकप्रमाणात स्वयंसेवी व्यक्ती व संस्था, ग्रामीण पुनर्रचनेच्या कामात हिरीरीने उतरण्याची आणि नव्या सस्थांना प्रेरणा देण्याची आणि असलेल्या संस्थांना अधिक परिणामकारक करण्याची चळवळ हाती घ्यावयास हवी.

### ६. समग्र ग्रामसेवकाची कल्पना

समाज आणि ग्रामसुधारणेचे व्रत घेऊन खेड्यात जाणारा ग्रामसेवक कसा असावा, त्याने कोणकोणती कामे करावीत, त्याचा दृष्टिकोण कसा असावा, तसेच त्याने काय करू नये या सर्वांचे विवेचन गांधीजींनी वेळोवेळी कलेले आहे. त्यातूनच त्यांची समग्र ग्रामसेवकाची कल्पनाही सिद्ध होते.

सेवेच्या भावनेने आणि कायम वास्तव्याच्या हेतूने ग्रामीण भागात जाऊन राहणाऱ्या सेवकाला कामाच्या सुरवातीस काय करावे याबाबत एक महत्त्वाचा सल्ला गांधीजींनी दिलेला आहे. ते म्हणतात, "आपले दारिद्य अल्पप्रमाणात वा पूर्णपणे कसे घालवावे हे त्यांना (म्हणजे गावकऱ्यांना) माहीत नाही. म्हणून तुम्ही, त्यांच्या सामाजिक आरोग्यविषयक आणि नैतिक परिस्थितीचा अभ्यास करून, आपल्या कामाची सुरुवात करावी." (हरिजन २३-११-३५).

खेड्यात नव्याने कामाला जाणाऱ्यांकडे गावकरी बहुधा संशयाच्या दृष्टीने पाहतात, ग्रामसेवकाला या संशयावर मात करून त्यांचा विश्वास संपादन करावयाचा असतो. त्यासाठी त्याला हुशारीने आणि श्रमशक्ती व बुद्धीचा वापर करून गावकऱ्यांची मने जिंकायला हवीत, याविषयी लिहिताना गांधीजी म्हणतात, "सत्य असे आहे की, या खेडुतांच्या सर्व आशा मावळलेल्या आहेत. त्यांना असा संशय येतो की नव्याने गावात येणारा मनुष्य त्यांचा गळा दाबायला किंवा केवळ त्याचे शोषण करायलाच येतो. श्रम आणि बुद्धी यांची फारकत झाल्यामुळे त्यांची विचारशक्तीसुद्धा दुबळी झालेली आहे. त्यांना उपलब्ध असणारे कामाचे तासही स्वतःच्या हितासाठी ते वापरू शकत नाहीत. अशा गावात प्रवेश करणाऱ्या

स्वयंसेवकाने प्रेम आणि आशावाद यांची कास धरावी. जेथल्या-स्त्रीपुरुषाच्या कामातून बुद्धीचा वापर वगळला गेला आहे आणि जेथे वर्षातील सहा महिने लोक बेकार राहतात, तिथे स्वत: श्रम आणि बुद्धीचा मेळ घालून काम केले तर स्वयंसेवकांना गावकऱ्यांचा विश्वास संपादन करणे अशक्य नाही. एवढेच नव्हे तर, त्यांच्यामध्ये राहूनच त्याला स्वत:पुरेसे उत्पन्नही मिळवला येईल. (हरिजन २३-११-३५) अर्थात जोपर्यंत स्वयंसेवक गावाचा विश्वास संपादन करू शकत नाही तोवर त्याने नुसते खेड्यात जाऊन काही उत्पादक कार्य करीत राहावे, असे गांधीजींनी सुचविले आहे. "त्याने नुसता उपभोग घेऊन राहू नये. काहीतरी उत्पादक काम करीत राहावे. जोवर त्याला गावकऱ्यांचा प्रतिसाद मिळत नाही आणि तो पूर्णवेळचा समाजसेवक होत नाही," तोवर त्याने हे करीत राहावे असे गांधीजी म्हणतात. (हरिजन २३-११-३५)

गावात राहायला जाताना आणि गेल्यानंतर कोणती काळजी घ्यावी याबद्दल गांधीजींचा सल्ला असा आहे की, "त्याने गावातल्या दुफळीपासून दूर राहावे. गावात राहायचे असे एकदा ठरविल्यानंतर, शहरात असताना ज्या गोष्टीशिवाय चालत नव्हते त्या सोडायला त्याने शिकले पाहिजे. एकदा मी गावात जाऊन बसल्यानंतर मला कोणत्या गोष्टी मी खेड्यात नेऊ नयेत याचा मला विचार करायला हवा. अगदी वरवर पाहता निरुपद्रवी गोष्टींबद्दलही. मुख्य प्रश्न आहे तो, या गोष्टी सामान्य खेडुतांच्या जीवनाशी सुसंगत आहते की विसंगत, याचा त्याने विचार केला पाहिजे. त्याने अभ्रष्टाचारी असले पाहिजे. आणि केवढ्याही मोठ्या मोहाला स्वत:ला आणि गावालाही बळी पडू देता कामा नये. एक शुद्ध चारित्र्याचा मनुष्यही संपूर्ण गाव वाचवू शकतो, जशी बिभीषणाने लंका वाचविली." (हरिजन २९-२-३६).

समग्र ग्रामसेवेच्या, गांधीजींच्या संकल्पनेत, गावाच्या सर्वांगीण विकासाचा विचार येतो. समाज सेवकाची जबाबदारी केवळ सामाजिक सुधारणांपुरती मर्यादित नाही, तर त्याने, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि मुख्यत: आर्थिक व नैतिक सुधारणांची जबाबदारी घेतली पाहिजे असे गांधीजींचे मत होते. गांधीजी म्हणतात, "कोणत्याही ग्रामेवकाने, मग तो किंवा ती कितीही ताकदीची असो, केवळ सामाजिक सुधारणांसाठी, गावाकडे वळता कामा नये. त्यांनी ग्रामीण जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श

केला पाहिजे. ग्रामसेवा म्हणजे, मला पुन्हा सांगितले पाहिजे की, खरेखुरे शिक्षणाचे कार्य आहे. केवळ 'तीन आर्'चे शिक्षण नाही. आणि मनुष्यप्राणी हा एक विचारशील प्राणी आहे आणि त्याला साजेसे जीवन खरेखुरे जगण्यासाठी त्यांची मनाची कवाडे उघडण्याचे शिक्षणाचे कार्य त्याला करायचे आहे.'' (हरिजन १६-११-३५)

समग्र ग्रामसेवक असा असायला हवा की तो सेवेच्या भावनेने झपाटलेला असेल. गावच्या जीवनाशी, आपल्या शहरी सवयी सोडून तो समरस होईल. आणि गावाच्या पूर्ण विकासाची जबाबदारी तो घेईल. प्रेम आणि सद्भावनेच्या सहाय्याने तो गावकऱ्यांचा विश्वास संपादन करील. त्याला चरख्यापासून इतर अनेक कामांची कौशल्ये स्वत:ला प्राप्त करावी लागतील आणि इतरांना ती प्राप्त करून द्यावी लागतील. आणि या सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे चारित्र्य शुद्ध असावे लागेल. गांधीजींनी म्हटले आहे, ''चारित्र्यहीन आणि सामान्य गावकऱ्यांपेक्षा वरच्या दर्जाचे जीवनमान राखणारा आणि गावकऱ्यांना जी कामे करावी लागतात, त्याविषयी अनभिज्ञ असणारा असा स्वयंसेवक हरिजन किंवा इतर गावकऱ्यांवर कोणताही परिणाम करू शकणार नाही.'' (हरिजन ११-४-३६).

या विशुद्ध चारित्र्याचा आणि त्याकरवी करावयाच्या ग्रामसेवेचा संबंध गांधीजी अध्यात्मिकतेशी जोडतात. परमेश्वराला ते दीनांच्या सेवेत पाहतात आणि समग्र ग्रामसेवक होऊ पाहणाऱ्यालाही ते तीच दिशा सुचवितात ''खेड्यातील जनतेची यथाशक्ती सेवा करण्यात असलेला हेतू केवळ मानवतावादी आहे काय?'' या प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजी म्हणतात, ''मी इथे दुसऱ्या कोणाची नव्हे तर माझीच सेवा करतो आहे. या खेडुतांच्या सेवेकरवी माझा स्वत:चाच मी शोध घेत आहे. मानवाचे अंतिम ध्येय परमेश्वराला ओळखणे हेच आहे आणि त्याच्या सर्व सामाजिक, राजकीय, धार्मिक कृती याच एक ध्येयाने प्रेरित आहेत. मनुष्य जातीची केलेली तात्कालिक सेवा हा याच प्रयत्नाचा एक भाग आहे कारण परमेश्वरप्राप्तीचा एकमेव मार्ग म्हणजे, त्याची निर्मिती असलेल्या सर्वांच्यात त्याला पाहणे आणि त्यांच्याशी एकरूप होणे. हे केवळ सर्वांच्या सेवेकरवीच साध्य होईल.'' (हरिजन २९-८-३६).

या दृष्टिकोणातून समाजसेवेकडे पाहणारा ग्रामसेवक हा खराखुरा व आदर्श

असा 'समग्र ग्रामसेवक'' ठरतो.

## ७. 'आदर्श खेड्या'ची संकल्पना

''जर उभा भारत खेड्यात राहात असेल तर असे एक तरी आदर्श खेडे निर्माण होऊ द्या की जे देशासाठी एक नमुना म्हणून उपयोगी पडू शकेल.'' (हरिजन ४-८-४६).

महात्मा गांधींचे केवळ एकच खेडे नव्हे तर देशातील सर्वच खेडी ही स्वयंपूर्ण आणि आदर्श अशी व्यवस्था बनावी असे स्वप्न होते आणि केवळ भारतापुरतेच त्यांचे हे स्वप्न मर्यादित नव्हते तर एकूण जागतिक अर्थव्यवस्थाच त्यांच्या खेड्यांच्या बळकट आणि शोषणविरहित, पायावर उभी राहावी असे त्यांना वाटत होते. प्यारेलाल यांनी, 'द लास्ट फेज' मध्ये, एका पत्रातील उद्धृत केलेले त्यांचे उद्गार यासंदर्भात महत्त्वाचे आहेत गांधीजींनी म्हटले आहे, ''माझी आता खात्री पटली आहे की, भारताला आणि त्याकरवी जगाला जर पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त करायचे असेल तर शक्य तितक्या लवकर हे सत्य जाणून घेतले पाहिजे की, लोकांना खेड्यातूनच राहावे लागेल, राजवाड्यात नव्हे. शहरांतून आणि राजवाड्यातून कोट्यावधी लोक एकमेकांबरोबर शांततेने राहू शकणार नाहीत. त्यांचा नाईलाज हाईल आणि त्यांना हिंसा आणि असत्य यांचा आश्रय घ्यावा लागेल. माझे असे ठाम मत आहे की सत्य आणि अहिंसा नसेल तर मानवी जीवनाच्या ऱ्हासाशिवाय दुसरे काही घडूच शकणार नाही. सत्य व अहिंसेची ओळख आपल्याला फक्त खेड्यातील साध्यासुध्या जीवनातून होऊ शकेल आणि हा साधेपणा चरखा आणि त्यातून सुचविल्या जाणाऱ्या गोष्टींतूनच मिळू शकेल.

एकूण जागतिक स्तरावरील मानवी जीवनाच्या सातत्याचा, सुरक्षित आणि शांततापूर्ण सहजीवनाचा हा दृष्टिकोण स्वीकारला तर राष्ट्राच्या आर्थिक आणि राजकीय जीवनाला अगदी वेगळी कलाटणी द्यावी लागेल. शहरे आणि खेडी यांच्यातील वाढत्या दरीचा नि परस्पर संबंधाचा वेगवेगळ्या पद्धतीने विचार करून त्यांच्या पायावर नियोजन करावे लागेल, आणि अशा नियोजनासमोर ध्येयेही उच्चतम ठेवावी लागतील. गांधीजींनी याचीही सूचना देऊन ठेवली आहे. ते म्हणतात, ''खरा प्रश्न आहे तो

मानवाचा अत्युच्च बौद्धिक, आर्थिक, राजकीय आणि नैतिक विकास कसा साध्य करावयाचा. या व्यवस्थेत सर्वांना समान हक्क व संधी असाव्या लागतील. वेगळ्या शब्दात सांगायचे तर, शहरवासी आणि ग्रामवासी या दोघांत, अन्न-पाण्याच्या दर्जाची कपडे आणि इतर बाबतीतील जीवनमानाची समानता असावी लागेल. आज ही समानता गाठण्याचा उपलब्ध मार्ग म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा पाणी आणि वीज या जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाच्या बाबतीत लोकांनी स्वयंपूर्ण झाले पाहिजे. अर्थात हे घडून येण्यासाठी या स्वयंपूर्ण खेड्यामधील जीवन सर्व सुखसोयींनी संपन्न आणि सुखी असावे लागेल. यालाच गांधीजी 'आदर्श खेडे' म्हणून गौरवतात.

आपल्या 'आदर्श खेड्या'च्या कल्पनेचे स्वरूप स्पष्ट करताना गांधीजींनी लिहिले आहे, "माझ्या आदर्श खेड्यात बुद्धिमान लोक राहत असतील. ते जनावरांप्रमाणे घाण आणि अंधाऱ्या जागेत राहत नसतील. स्त्री व पुरुष स्वतंत्र असतील व जगातील कोणत्याही शक्तीपुढे खंबीरपणे उभे राहतील. प्लेग, कॉलरा, देवी यांचे उच्चाटन झालेले असेल. कोणीही आळसात आणि कोणीही श्रीमंतीत लोळत नसेल. प्रत्येकाला आपल्या वाटणीचे शारीरिक श्रम करावेच लागतील." (हरिजन ४-८-४६)

निरोगी अशा या खेड्याची अर्थव्यवस्था सांगताना गांधीजींनी लिहिले आहे की, 'खेडुतांनी असे उच्च दर्जाचे कौशल्य संपादन करावे की, त्यांनी केलेल्या वस्तूंना बाहेर तयार बाजार उपलब्ध होईल. पूर्ण विकसित अशा खेड्यात उच्च दर्जाच्या कौशल्याची आणि कलाबुद्धीची वानवा असणार नाही. खेड्यांचे स्वतःचे कवी असतील, कलावंत असतील, स्थापत्यशास्त्रज्ञ, भाषाशास्त्रज्ञ आणि संशोधकही असतील. थोडक्यात, जीवनातील अशी कोणतीही गोष्ट नसेल की जी खेड्यामध्ये असणार नाही." (हरिजन १०-११-४६).

आदर्श खेड्याची एकूण व्यवस्थाच अशी असेल की तेथे सर्व सुखसोयींनी युक्त अशा तऱ्हेचे जीवन असेल. याचे वर्णन गांधीजींनी असे केलेले आहे की, "आदर्श भारतीय खेडे असे असेल की ज्यात जलनिस्सारणाची उत्तम सोय असेल. पाच मैलांच्या अंतरात उपलब्ध असलेल्या मालाच्या साहाय्याने उभारलेल्या झोपड्या पुरेसा प्रकाश

असलेल्या आणि हवेशीर असतील. झोपड्यांना पुरेसे अंगण असेल आणि त्याचा उपयोग जनावरांना ठेवण्यासाठी आणि कुटुंबापुरेसा भाजीपाला पिकविण्यासाठी लोक करतील. गावातील रस्ते व गल्ल्या स्वच्छ असतील. गावात सर्वांसाठी आणि सर्वांपुरेशा विहिरी असतील. प्रार्थना मंदिरे असतील. शिवाय सर्वांना एकत्र येण्यासाठी जागा असेल, सर्व जनावरांसाठी सामाईक चराऊ कुरण असेल. तसेच सहकारी दूध उत्पादन केंद्र, प्राथमिक व माध्यमिक शाळा असतील. शाळांमध्ये औद्योगिक शिक्षण हा महत्त्वाचा भाग राहील. गावातील तंटे सोडविण्यासाठी पंचायत असेल. गाव स्वत: पुरेसे अन्नधान्य, फळे व भाजीपाला आणि खादी यांचे उत्पादन करील. आदर्श खेड्याविषयी माझी कल्पना अशी आहे.'' (हरिजन ९-१-३७).

या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी गांधीजींनी आपल्या आदर्श खेड्याची व्यवस्था वर्णिलेली आहे. खेडे हे एक स्वतंत्र गणराज्य असेल, तेथील पंचायत लोकनियुक्त असेल आणि तिच्याकडे कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ असे सर्व अधिकार असतील आणि पूर्णत: लोकशाही तत्त्वाने तेथील राज्यकारभार चालविला जाईल, असेही वर्णन त्यांनी केलेले आहे. तसेच हे प्रत्येक खेडे काही मूलभूत बाबतीत स्वावलंबी आणि इतर बाबतीत इतर खेड्यांशी परस्परावलंबित असेल. अशी त्याची रचना सांगितली आहे.

अशा आदर्श खेड्यांच्या निर्मितीची गरज प्रतिपादन करताना गांधीजींनी त्याचा अंतिम उद्देशही सांगितला आहे. भारताचे आर्थिक संविधान कसे असावे याचे वर्णन त्यांनी फार पूर्वीच करून ठेवले आहे. ते म्हणतात, ''माझ्या मते भारताचे आणि तसे म्हटले तर सबंध जगाचे आर्थिक संविधान असे असेल की, त्याच्या अंतर्गत कोणीही अन्न व कपड्याशिवाय असणार नाही. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर प्रत्येकाला, आपल्या आवश्यक गरजा भागविण्यापुरेसे काम नेहमीच प्राप्त होईल. आणि हे उद्दिष्ट सर्व ठिकाणी साध्य करावयाचे असेल तर, अत्यावश्यक गरजांच्या बाबतीतील उत्पादनाची साधने बहुसंख्य लोकांच्या नियंत्रणात असावी लागतील. देवाने दिलेल्या हवा आणि पाण्याप्रमाणे याही वस्तू लोकांना मुक्तपणे उपलब्ध असतील. त्यांचा उपयोग दुसऱ्यांच्या शोषणाचे साधन म्हणून करता येणार नाही. त्यांचे एखाद्या देशाच्या, राष्ट्राच्या किंवा लोकांच्या गटांच्या हाती केंद्रीकरण होणे अन्याय्य ठरेल. या साध्या तत्त्वाकडे दुर्लक्ष झाल्यामुळेच

आज आपण दारिद्र्याच्या आढळ, केवळ याच दुर्दैवी देशात नव्हे तर जगाच्या इतरही भागात पाहत आहोत.'' (यंग इंडिया १५-११-२८)

दारिद्र्य आणि शोषण हे दोन आधुनिक जगाचे फार मोठे आणि परस्पर संबंधित असे दोष आहेत. आणि 'गरजा या सातत्याने वाढतच जातात.' या गृहितावर आधारलेल्या पाश्चात्य अर्थशास्त्राला या रोगांवरचे औषध सापडलेले नाही. इतकेच नव्हे तर जी काही औषध उपाययोजना केली गेली त्याने हे रोग वर्षानुवर्षे बळावतच गेले आहेत. गांधीजींनी या मूलभूत गृहितालाच, मुळालाच घाव घालून स्वयंपूर्ण, आदर्श, शोषणरहित आणि दारिद्र्यविरहित अर्थरचनेकडे आपल्या विचारांची दिशा वळविली आहे. त्यांनी म्हटले आहे, ''काही प्रमाणात भौतिक बहुलता आणि सुखसोयी आवश्यक आहेत, पण विशिष्ट प्रमाणाबाहेर मात्र त्यांची मदत होण्याऐवजी अडथळाच होतो. यामुळे, गरजा सातत्याने वाढविण्याचा आदर्श आणि त्या पुरविण्याचा अट्टाहास हा एक भ्रम आहे. स्वत:च्या भौतिक आणि संकुचित अशा स्वत:च्या बौद्धिक गरजांनाही कुठेतरी पूर्णविराम असला पाहिजे.'' (हरिजन २९-८-३६)

आपल्या गरजा मर्यादित करण्याच्या गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा आशय हा अशा प्रकारे मानवी जीवनातील दारिद्र्य आणि शोषण समूळ नष्ट करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित आहे. आणि ही प्रक्रिया घडून येणे केवळ स्वयंपूर्ण खेड्यांच्या गणराज्यांच्या जगातच शक्य आहे. गांधीजी म्हणत, ''हा समाज सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत उच्च कोटीचा असेल. यात प्रत्येक माणसाला आपल्याला काय हवे हे माहीत असेल आणि त्याहूनही, हे माहीत असेल की, समान श्रमांच्या सहाय्याने इतरांना जेवढे प्राप्त होईल त्यापेक्षा अधिक कोणालाही हवे असणार नाही.'' (हरिजन २८-७-४६). गांधीजी, मानवी जीवनाच्या अंतिम आदर्श व्यवस्थेत असावे लागेल, असे हे महान तत्त्व प्रतिपादन करीत असताना, त्याला निसर्गव्यवस्थेतील नियमांचा आधार देऊ पाहतात. ते म्हणतात, ''अपवाद विरहित असा निसर्गाचा मूलभूत नियम आहे की, आपल्या गरजांच्या पुरेसे इतके उत्पादन नेहमीच निसर्ग निर्माण करतो आणि प्रत्येकाने जर स्वत:ला केवळ आवश्यक इतकेच घेतले, जास्त घेतले नाही, तर जगात दारिद्र्य राहणार नाही, आणि कुणीही मनुष्य भुकेने मरणार नाही.''

महात्मा गांधी केवळ ग्रामीण जीवनातील भौतिक सुधारणांविषयीच बोलत नाहीत तर मानसिक बदलाविषयीही बोलतात. ते केवळ ग्रामीण जीवनातील मूलभूत रोगांवरील तात्कालिक उपाययोजना सांगत नाहीत तर सार्वकालिक उपाययोजना सांगतात. आणि हे सांगताना केवळ भारतापुरते मर्यादित अर्थाने सांगत नाहीत तर जागतिक स्तरावरून आपले विचार मांडतात. ग्रामीण पुनर्निर्माणाची त्यांची कल्पना केवळ सुधारणेची नाही तर मूलभूत क्रांतीची आहे. अर्थात ही क्रांती अहिंसक आणि सत्याची कास धरूनच घडून येणारी आहे, हा ग्रामीण पुनर्निर्माणाच्या गांधी प्रणीत सप्तपदीचा साकल्याने, आशय आहे.

संदर्भ


१) आनंद हिंगोरानी, प्रस्तावना, ''द व्हिलेज रीकन्स्ट्रक्शन''- एम्. के. गांधी.

२) महात्मा गांधी, यंग इंडिया, ७-११-२९.

३) प्यारेलाल, द लास्ट फेज खंड... पाने ५४४-४८

४) बिपीन बिहारी, ''गांधीयन ॲप्रोच टू रूरल इंडस्ट्रियलायसेशन,'' गांधी ॲंड सोशल सायन्सेस संपादक. एल्. पी. विद्यार्थी आणि इतर. बुकहाइव पब्लिहाई, नवी दिल्ली.

५) मेरोमोन इटो, स्टेजेस ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ ॲन्ड द कॉन्शसनेस ऑफ रीजनल डिव्हलपमेंट, डिसिमिनेहान ऑफ नॉलेज सिरीज नं. २३, जानेवारी १९६८, एशियन प्रॉडक्टिव्हिटी ऑर्गनायझेशन, टोकियो.

६) अशा तऱ्हेचा एक प्रयोग दाभोण-ऐने-रणकोळ या ठाणे जिल्ह्यांतील आदिवासी गावांतून, ग्राममंगल या स्वेच्छा संस्थेतर्फे चालू आहे.

७) एन्. के. बोस, 'सिलेक्शन्स फ्रॉम गांधी', नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद, १९४८, पृ. ४२
(नागेश्वरराव प्रसाद यांच्या ''डिसेंट्रलायझेशन इन युगोस्लाव्हिया ॲंड इंडिया'' वरून उद्धृत. पृ. १४८)

८) नागेश्वरराव प्रसाद, ''डिसेंट्रलायझेशन इन युगोस्लाव्हिया ॲंड इंडिया'' पृ. १८४

९) नागेश्वरराव प्रसाद उ. वि. पृ. १९१

१०) विनोबा भावे, 'गांधी जसे पाहिले जाणले विनोबांनी', संपादक कांतीभाई शहा, परंधाम प्रकाशन, पृ. ११५-११६

११) पानसे, रमेश, 'महाराष्ट्रातील आर्थिक व्यवहार पाच शोधनिबंध', प्राची प्रकाशन, मुंबई पृ. २४-२५
१२) प्यारेलाल, 'द लास्ट फेज', नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद १९५८ व्हाल्युम, पृ. ५४४
१३) प्यारेलाल, उनि. पृ. ५४४-४८५
१४) महात्मा गांधी, 'स्पीचेस अँड रायटिंग्ज ऑफ महात्मा गांधी, पृ. ३८४